# भारतीय कम्युनिस्ट पक्षाची

# घटना

**भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या**
**महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन**

जून २०१०

एप्रिल ९२ मध्ये हैद्राबाद येथे झालेल्या पक्षाच्या १५ व्या काँग्रेसने मंजूर केलेले 'प्रास्ताविक' थ्रिशूर येथे मार्च ९३ मध्ये भरलेल्या संघटनात्मक परिषदेच्या दुरुस्त्या व तेथील निर्णयाला अनुसरून राष्ट्रीय कौन्सिलने (जून ९३) मंजूर केलेल्या दुरुस्त्या यांचा समावेश करून घटनेची नवी आवृत्ती प्रसिद्ध करीत आहोत.

(मूळ इंग्रजीचं भाषांतर)

## सुधारित आवृत्ती

या आवृत्तीत २०व्या पक्ष काँग्रेसच्या निर्णयाप्रमाणे नंतरच्या झालेल्या राष्ट्रीय कौन्सिलच्या बैठकीत मंजूर केलेल्या दुरुस्त्यांचा समावेश आहे.

**प्रा. शिवदास उटाणे**

मूल्य : १० रुपये

## प्रास्ताविक

भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा भारतीय कामगारवर्गाचा राजकीय पक्ष आहे. समाजवाद आणि कम्युनिझम (साम्यवाद) यांच्याशी एकनिष्ठ राहणाऱ्या कामगार, शेतकरी आणि सर्वच कष्टकरी लोकांची ती स्वयंसेवी संघटना आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष एका न्यायाधिष्ठित समाजाची प्रस्थापना करण्याच्या ध्येयाशी बांधील आहे. मानवाचा मानवाकडून होणाऱ्या शोषणाचा अंत करण्याचा मार्ग खुला करणाऱ्या लोकशाही हक्कांची हमी आणि सर्वांना समान संधी त्या समाजात असणार आहे आणि लक्षावधी कष्टकऱ्यांच्या श्रमातून निर्माण होणाऱ्या संपत्तीवर काही मूठभर लोकांची सत्ता असणार नाही. अशा नव्या समाजवादी समाजाचा मार्ग आखण्यासाठी मार्क्सवाद-लेनिनवादाचे शास्त्र अत्यावश्यक आहे. अर्थातच आपल्या देशातील विशिष्ट ऐतिहासिक स्थिती, तसेच आपल्या देशाची खास वैशिष्ट्ये, घटक, आपला इतिहास, परंपरा, संस्कृती, सामाजिक जडणघडण आणि विकासाची अवस्था या साऱ्या गोष्टी विचारात घेऊनच हा मार्ग निर्धारित केला जाईल. कठीण संघर्षाशिवाय आणि लोकशाही आचार व मूल्ये यांच्याशी बांधिलकी ठेवल्याशिवाय हे ध्येय साध्य करता येणे शक्य नाही.

समाजवादाच्या बांधणीसाठी समाजवादी लोकशाहीवर आधारलेली अशी सत्ता कष्टकरी लोकांच्या हातात असणे अगदी आवश्यक आहे. श्रमजीवी लोक आणि त्यांचे ऐतिहासिक कार्य यांच्याशी अविचल निष्ठा ठेवून भारतीय



कम्युनिस्ट पक्ष हे ध्येय साकार करण्यासाठी कार्य करीत राहील आणि भारतात साम्यवादी समाज स्थापन करण्याच्या अंतिम ध्येयाकडे मार्गक्रमण करीत राहील.

भारतातील समाजवादी समाज व समाजवादी शासन, व्यक्तिस्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य आणि धार्मिक श्रद्धा स्वातंत्र्य या साऱ्या हक्कांचे रक्षण करतील. आपल्या घटनेच्या चौकटीत राहण्याचे मान्य करणारे विरोधी पक्ष संघटित करण्याचा हक्कही दिला जाईल. समाजवादी घटना नेहमीच सावध राहील आणि लोकशाहीचा नाश व लोकांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली या दोन्ही गोष्टी रोखण्याचा प्रयत्न करील. वस्तुनिष्ठ वास्तवतेवर आधारून पार्टीची राजकीय धोरणे व भावी समाजदर्शन निश्चित केले जाईल. या क्रमामध्ये आपल्या पक्षाच्या पूर्वानुभवाची पक्षाला मदत होईल. जोपर्यंत शासनसत्ता भांडवलदारीवर्गाच्या हातात आहे तोपर्यंत भांडवलदारी मार्गाने जाऊन हे कार्य करता येणार नाही, हे आपल्याला आपल्या जीवनानेच दाखवून दिले आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा आपली पक्षसंघटना, तसेच आपले कार्य, लोकशाही मध्यवर्तित्वावर आधारणार आहे. कृतीमध्ये ऐक्य असणे आवश्यक आहे यावर पक्षाचा विश्वास आहे. पार्टी काँग्रेसचे, नॅशनल कौन्सिलचे आणि सर्व स्तरावरील पार्टीघटकांचे निर्णय सर्व पार्टी सभासदांना बंधनकारक राहतील. आशयपूर्ण राजकीय प्रश्नांवरील अल्पसंख्याकांची मतेसुद्धा पार्टीघटक व पार्टीसभासद यांना सांगितली जातील. राजकीय किंवा संघटनात्मक आधारावर

किंवा संधिसाधू कारणांसाठी गट बांधण्यास कदापि अनुमती दिली जाणार नाही. मोकळ्या व मुक्त चर्चेवर पार्टीचा विश्वास आहे. भिन्न मत असणाऱ्यांविषयीही पार्टीला आदर आहे.

देशप्रेमाच्या उच्च भावनांनी प्रेरित होऊन कम्युनिस्ट पक्ष भारताचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व गौरवाने उचलून धरतो. राष्ट्रीय ऐक्य व राष्ट्रीय एकात्मता यासाठी तो लढत आहे आणि सर्व फुटीरतावादी आणि प्रतिगामी कल्पना, जातीयवाद, पुनरुज्जीवनवाद, अस्पृश्यता, जमातवाद, धार्मिक असहिष्णुता, स्त्रिया व पुरुषात भेदभाव आणि स्त्रियांना समान हक्क देण्यास नकार, या साऱ्या गोष्टींना पक्ष विरोध करीत आहे. आपल्याला पटणाऱ्या श्रद्धा व्यक्त करणे व त्यानुसार आचरण करणे, हा समाजातील सर्व विभागांतील लोकांचा हक्क आहे, यावर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा ठाम विश्वास आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा कायद्याने प्रस्थापित झालेल्या भारताच्या घटनेशी खरे इमान व निष्ठा ठेवील, त्याचप्रमाणे समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही यावर निष्ठा ठेवील. आणि भारताचे सार्वभौमत्व, ऐक्य आणि एकात्मता यांना पाठिंबा देईल.

सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष जबरदस्त लढा देईल. आपल्या समाजात सामाजिक विषमता आणि जुना पारंपरिक दृष्टिकोन यांचे प्राबल्य आहे. आपल्या समाजाच्या प्रगतीमध्ये सामाजिक आणि आर्थिक असमानता हे दोन फार मोठे अडथळे आहेत. जातीय विचारपद्धती आणि जातीय आचारकांड यांचा आपल्या समाजाच्या ऐक्यासाठी



त्याग आवश्यक आहे. शास्त्रीय दृष्टिकोन आणि समाजवादी उद्दिष्ट्ये समाजामध्ये रुजवण्याच्या कार्यात आपल्या उदात्त परंपरा, ऐतिहासिक अनुभव, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि महान समाजसुधारक व विचारवंत यांचे अमोल विचार, या साऱ्यांची मदत आपल्या पक्षाला होणार आहे.

शांततेसाठी लढा, नववसाहतवादविरोधी लढा, न्याय्य समाजस्थापनेसाठी लढा हे जगभरच्या प्रगतिशील शक्तींमध्ये समान कार्यबिंदू आहेत. स्वातंत्र्य, समता आणि परस्परांमध्ये हस्तक्षेप न करणे, या तत्त्वांना चिकटून राहून भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा साम्राज्यशाहीविरुद्ध आणि सामाजिक प्रगतीसाठी लढणाऱ्या सर्व शक्ती, कष्टकरी जनतेचे अन्य पक्ष यांच्याशी मैत्रीसंबंध प्रस्थापित करण्याचे कसोशीने प्रयत्न करील. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा असा दृढ विश्वास आहे की, जगभराच्या लोकांचे मूलभूत आणि खरेखुरे हितसंबंध एकच आहेत आणि म्हणून कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयवादावर आम्ही ठाम आहोत. जगातल्या अन्य देशांत न्याय व पुरोगामी उद्दिष्टांसाठी लढणाऱ्या लोकांशी एकजूट ही आपल्या लढ्याला मदतच करील.

❒❒❒



**कलम १**
**नाव**

या पक्षाचे नाव 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष' असे राहील.

**कलम २**
**बोधचिन्ह**

लाल पार्श्वभूमीवर पांढऱ्या रंगात काढलेला एकमेकांना छेदणारा हातोडा व कोयता आणि त्याच्याभोवती पांढऱ्या रंगात 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष' अशी वर्तुळाकार काढलेली अक्षरे हे पक्षाचे बोधचिन्ह राहील.

**कलम ३**
**निशाण**

रुंदीच्या दीडपट लांबी असलेले लाल निशाण हे पक्षाचे निशाण राहील. निशाणाच्या मधोमध पांढऱ्या रंगात परस्परांना छेदणारा हातोडा व कोयता असेल.

**कलम ४**
**सभासदत्व**

१. ज्याला पक्षाचा कार्यक्रम व घटना मान्य आहे, जो कोणत्याही एका पक्षसंघटनेत कार्य करण्यास, नियमितपणे पक्षसभासदत्वाची वर्गणी देण्यास व पक्षाचे निर्णय अमलात आणण्यास तयार आहे, अशा अठरा वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या कोणत्याही भारतीय नागरिकास पक्षाचा सभासद होता येईल.

२. पक्षात प्रवेश मिळविण्यासाठी नव्या सभासदांना



वैयक्तिक अर्ज द्यावा लागेल आणि दोन पक्ष सभासदांच्या शिफारसीवर पक्ष-शाखेमार्फत पक्षात दाखल करून घेतले जाईल. शहर, तालुका, जिल्हा, राज्य आणि मध्यवर्ती पातळ्यांवरील पक्ष कौन्सिलांनाही पक्षात नवे सभासद दाखल करून घेण्याचा अधिकार आहे. अर्जदाराची शिफारस करणाऱ्या पक्ष-सभासदांनी आपल्या स्वत:च्या माहितीच्या आधारावर आणि जबाबदारीची योग्य जाणीव ठेवून या अर्जदारासंबंधीची खरी माहिती संबंधित पक्ष-शाखेला किंवा पक्ष-कौन्सिलला दिलीच पाहिजे. पक्ष- सभासदत्वासाठी आलेले सर्व अर्ज ते दाखल करण्यात आल्यानंतर व त्यांच्यासंबंधी शिफारस केली गेल्यानंतर एका महिन्याच्या आत योग्य त्या कौन्सिलपुढे ठेवण्यात आलेच पाहिजेत.

३. पक्षात प्रवेश देण्याच्या प्रश्नावर पक्ष-शाखेची सर्वसाधारण सभा निर्णय घेईल आणि अर्जदाराला पक्ष प्रवेश देण्यात आला तर त्याला किंवा तिला असा प्रवेश दिल्याच्या दिवसापासून सहा महिन्यापर्यंत उमेदवार सभासद मानण्यात येईल.

४. दुसऱ्या एखाद्या राजकीय पक्षाचा स्थानिक, जिल्हा किंवा राज्य पातळीवरचा प्रमुख सभासद जर पक्षात दाखल होऊ इच्छित असेल, तर त्याला किंवा तिला पक्षाचा सभासद करून घेण्यापूर्वी स्थानिक पक्ष-घटकांच्या किंवा जिल्हा किंवा राज्य कौन्सिलच्या मान्यतेच्या जोडीला निकटच्या वरिष्ठ पक्ष-घटकाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

५. ज्या सभासदांना एकदा पक्षातून काढून टाकण्यात आले असेल, त्यांना पुन्हा पक्षात प्रवेश मिळू शकेल; मात्र

त्यासाठी त्यांना काढून टाकण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणाऱ्या पक्ष-घटकाने किंवा वरिष्ठ घटकाने तसा निर्णय घेतला तरच पुन्हा प्रवेश मिळेल. तत्पूर्वी त्याला ज्या घटकातून काढले असेल त्या घटकाचे मत लक्षात घेतले जाईल.

६. उमेदवार सभासदांची कर्तव्ये व अधिकार संपूर्ण सभासदाप्रमाणेच असतात; मात्र त्यांना पक्षांतर्गत निवडणुकीत मते देण्याचा किंवा निवडणुकीत उभे राहण्याचा अगर कोणत्याही ठरावावर मते देण्याचा अधिकार नसतो.

७. उमेदवार सभासदांना प्रवेश देणाऱ्या पक्षशाखेने किंवा घटकाने त्यांना पक्षाचा कार्यक्रम, घटना आणि प्रचलित धोरण यांचे प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि पक्षशाखेचे किंवा घटकाचे सभासद या नात्याने त्यांना कार्यप्रवण करण्याची व्यवस्था करून त्यांच्या प्रगतीकडे लक्ष पुरविले पाहिजे.

८. उमेदवारीचा काळ संपल्यानंतर सदरहू उमेदवार सभासद हा पूर्ण सभासदत्व देण्याच्या योग्यतेचा आहे किंवा नाही यासंबंधी पक्षशाखा किंवा पक्षघटक चर्चा करील. संबंधित पक्षशाखा किंवा पक्षघटक उमेदवार सभासदांना पूर्णसभासद करून घेऊ शकतो किंवा त्याच्या उमेदवारीची मुदत आणखी जास्तीतजास्त सहा महिने वाढवू शकतो. एखादा उमेदवार सभासद अयोग्य आहे असे आढळून आले, तर पक्षशाखा किंवा पक्ष-घटक त्याची उमेदवारी रद्द करू शकतो. उमेदवार सभासदांची भरती आणि पूर्ण सभासद करून घेण्याबद्दल शिफारशी यासंबंधीचा अहवाल संबंधित



पक्षशाखेने किंवा पक्षघटकाने निकटच्या वरिष्ठ पक्ष-घटकाकडे नियमितपणे पाठविला पाहिजे.

९. हा अहवाल तपासून वरिष्ठ घटकाला त्या निर्णयात काही फेरबदल अगर सुधारणा कराव्याशा वाटल्या, तर तो अहवाल पाठविणाऱ्या पक्षशाखेशी अगर पक्षघटकाशी विचारविनिमय करून त्याला तसे करता येईल. उमेदवार सभासदांना प्रवेश देणे व पूर्ण सभासदत्व मंजूर करणे यावर देखरेख ठेवण्याचे अधिकार जिल्हा आणि राज्य कौन्सिलकडे असतील व त्यांना खालच्या घटकांनी याबाबतीत घेतलेल्या निर्णयात सुधारणा करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा हक्क असेल.

१०. उमेदवारीची मुदत पूर्ण होऊन एक महिना लोटला तरीही संबंधित पक्षशाखेने उमेदवार सभासदत्वाची मुदत वाढविल्याचा किंवा रद्द केल्याचा निर्णय घेतला नाही किंवा काहीच अहवाल तयार केला नाही, तर उमेदवार सभासद पूर्ण सभासद बनेल.

११. कोणत्याही स्त्री किंवा पुरुष सभासदाला आपले सभासदत्व एका घटकातून दुसऱ्या घटकात बदली करून घेता येईल. असे करताना त्याला ज्या घटकातून बदली करून घ्यावयाची असेल त्या घटकाची संमती व त्याच्याकडूनच नव्या घटकासाठी ओळखपत्र घ्यावे लागेल. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा एका राज्यातून दुसऱ्या राज्यात बदली हवी असेल तर संबंधित जिल्हा किंवा राज्य कौन्सिलची मान्यता आवश्यक आहे.



## कलम ५
## पक्षप्रतिज्ञा

सर्व उमेदवार तसेच पूर्ण सभासदांना पक्षाच्या प्रतिज्ञापत्रकावर सही करावी लागेल. ही प्रतिज्ञा खालीलप्रमाणे असेल :

''पक्षाची ध्येये व उद्दिष्ट्ये मला मान्य आहेत आणि पक्षाच्या घटनेनुसार वागण्याचे व पक्षाचे निर्णय एकनिष्ठपणे अमलात आणण्याचे मी मान्य करतो.''

''कम्युनिझमच्या आदर्शांना अनुसरून वागण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन आणि वैयक्तिक हितापेक्षा पक्षाचे आणि जनतेचे हित श्रेष्ठतर लेखून मी नि:स्वार्थीपणाने कामगारवर्ग आणि श्रमिक जनता व देश यांची सेवा करीन आणि त्यांच्यासाठी लढेन.''

## कलम ६
## पक्षसभासदत्वाची कार्डे

१. पक्षात दाखल करून घेतल्यानंतर प्रत्येक पक्ष-सभासदाला पक्ष-सभासदत्वाचे एक कार्ड (प्रमाणपत्र) देण्यात येईल.

२. ही कार्डे भारतात सर्वत्र सारख्याच नमुन्याची असतील आणि राज्य कौन्सिलकडून ती दिली जातील. कार्डाचे स्वरूप काय असावे व त्यावरील मजकूर कोणता असावा हे राष्ट्रीय कार्यकारिणी ठरवील.

## कलम ७
## सभासदत्वाच्या कार्डाचे नूतनीकरण

१. पक्ष-सभासदत्वाच्या कार्डाचे दरसाल नूतनीकरण



होईल. पक्ष-सभासद ज्या पक्षसंघटनेत असेल त्या संघटनेत केलेल्या तपासणीच्या (चेक-अप) आधारे नवे कार्ड राज्य कौन्सिलच्या दिग्दर्शनाखाली आणि देखरेखीखाली देण्यात येईल. पक्ष-सभासदाने कोणतेही योग्य कारण न दाखविता सतत सहा महिन्यांच्यावर पक्षजीवनात किंवा कार्यात भाग घेतलेला नसेल तर किंवा पक्ष-सभासदत्वाची वर्गणी आणि लेव्ही दिलेली नसेल तर, त्याला नवे कार्ड देण्यात येणार नाही.

२. पक्ष-सभासदत्वाचे नूतनीकरण शाखा अगर कमिटीच्या पक्ष-सभासदांच्या सभेत केलेल्या तपासणीच्या (चेक-अप) आधारावर केले जाईल आणि पक्ष-कार्ड देण्यास नकार देण्यात आला तर त्याची कारणे संबंधित सभासदाला सांगितली जातील. नजीकच्या वरिष्ठ घटकाकडे अपील करण्याचा हक्क त्याला राहील.

३. अशा रीतीने प्रत्येक पक्ष-शाखेने किंवा घटकाने आपल्या सभासदांना दिलेल्या नव्या कार्डासंबंधीचा अहवाल निकटच्या वरिष्ठ घटकाकडे त्याच्या शिक्कामोर्तबासाठी आणि नोंदणीसाठी पाठविला जाईल.

४. पक्ष-सभासदांच्या यादीची तपासणी करण्याचा हक्क राज्य कौन्सिलला आणि जिल्हा कौन्सिलला राहील.

## कलम ८
## पक्ष-सभासदत्वाचा राजीनामा

१. एखाद्या पक्ष-सभासदाला पक्षाचा राजीनामा द्यावासा वाटल्यास त्याला किंवा तिला तो संबंधित पक्ष-शाखेस सादर

करावा लागेल. ती पक्ष-शाखा आपल्या सर्वसाधारण सभेचा निर्णय घेऊन हा राजीनामा स्वीकारू शकेल आणि त्या सभासदाचे नाव पक्ष-सभासदांच्या पटावरून कमी करण्याचा निर्णय घेऊ शकेल आणि आपल्या निकटच्या वरिष्ठ घटकास त्याप्रमाणे कळवील.

२. अशा सभासदाने राजीनामा देण्याविषयीचे आपले मत बदलावे म्हणून संबंधित पक्ष-शाखेला किंवा पक्ष-घटकाला, आवश्यक वाटल्यास, त्याचे किंवा तिचे मन वळविण्याचा प्रयत्न करता येईल.

३. पक्षाचा राजीनामा देऊ इच्छिणाऱ्या पक्षसभासदावर पक्षाच्या शिस्तीचे गंभीर उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्याजोगा असेल आणि हा आरोप पुराव्यानिशी सिद्ध होऊन त्यामुळे त्याला किंवा तिला पक्षातून सस्पेंड करणे किंवा काढून टाकणे समर्थनीय ठरण्याजोगे असेल तर अशा राजीनाम्याला पक्षातून हकालपट्टीचे स्वरूप देता येईल.

४. राजीनामे स्वीकारण्याऐवजी पक्षातून हकालपट्टी केली गेल्याची अशी सर्व प्रकरणे ताबडतोब निकटच्या वरिष्ठ पक्ष-घटकाकडे पाठविली पाहिजेत व त्यावर त्या घटकाची मान्यता मिळविली पाहिजे.

## कलम ९
## सभासदत्वाची वर्गणी

उमेदवार आणि पूर्ण अशा सर्वच पक्ष-सभासदांना वार्षिक तीन रुपये या दराने पक्ष-सभासदत्वाची वर्गणी द्यावी लागेल. पक्षाची ही वार्षिक वर्गणी पक्षात दाखल होताना किंवा पक्ष-



कार्डाच्या नूतनीकरणाच्या वेळी द्यावी लागेल.

## कलम १०
## पक्षाच्या वर्गणीचे वाटप

पक्ष-शाखेने किंवा घटकांनी पक्ष-सभासदांकडून वसूल केलेल्या वर्गणीचे वाटप पुढीलप्रमाणे होईल :

राष्ट्रीय कौन्सिलसाठी वीस टक्के.

राज्य कौन्सिलसाठी चाळीस टक्के आणि उरलेला ४० टक्के भाग जिल्हा कौन्सिल, पक्ष-शाखा आणि जेथे अस्तित्वात असेल तेथे स्थानिक घटक यांच्यात विभागला जाईल. ह्या विभागणीचे प्रमाण संबंधित राज्य कार्यकारिणीच्या निर्णयानुसार ठरविले जाईल.

## कलम ११
## पक्षाची लेव्ही

पक्ष-सभासदांनी पक्षाला देण्यासंबंधीच्या लेव्हीचे मार्गदर्शक नियम राष्ट्रीय कौन्सिल संमत करील. या नियमानुसार राष्ट्रीय कार्यकारिणी आणि राज्य कार्यकारिणी पक्ष-सभासदांवर लेव्हीची आकारणी करील.

## कलम १२
## पक्ष-सभासदांची कर्तव्ये

१. पक्षसभासदांची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :

(क) ते ज्या पक्षसंघटनेत असतील त्या संघटनेच्या कार्यात नियमितपणे भाग घेणे; पक्षाचे धोरण, निर्णय व आदेश



यांची इमानदारीने अंमलबजावणी करणे आणि पक्षाने ठरविलेली लेव्ही नियमितपणे देणे.

(ख) जनतेच्या शोषणाच्या व दमनाच्या सर्व प्रकारांविरुद्ध श्रमजीवी जनतेचे हित लक्षात घेऊन लढणे; जनतेची एकनिष्ठेने सेवा करणे व तिच्याशी असलेले आपले संबंध सतत दृढ करणे, बहुजनसमाजापासून शिकणे आणि त्यांची मते व मागण्या पक्षाला कळविणे, खास सवलत दिली नसेल तर पक्षाच्या मार्गदर्शनाखाली एखाद्या जनसंघटनेत कार्य करणे.

(ग) मार्क्सवादी-लेनिनवादी शास्त्राचा अभ्यास करणे आणि आपल्या आकलनाची पातळी वाढविण्याचा प्रयत्न करणे.

(घ) पक्षाची वर्तमानपत्रे व प्रकाशने वाचणे, त्यांना पाठिंबा देणे व ती लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करणे.

(ङ) पक्षाची घटना व पक्षाची शिस्त यांचे पालन करणे आणि कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयत्वाच्या बाण्याने व कम्युनिझमच्या उदात्त ध्येयांना अनुसरून वागणे.

(च) जनतेचे व पक्षाचे हित वैयक्तिक हितापेक्षा श्रेष्ठतर मानणे.

(छ) धर्म, जात किंवा लिंग यांचा आधार घेऊन केलेल्या सर्व प्रकारच्या दमनाविरुद्ध व पक्षपाताविरुद्ध सतत लढणे आणि धर्मवाद, जातीयवाद, संकुचित राष्ट्रवाद व विभागीय वाद यांसारख्या फुटपाड्या प्रवृत्तींचा प्रखर प्रतिकार करणे.



(ज) परस्परांशी मैत्रीचे (कॉम्रेडचे) संबंध जोडणे आणि पक्षामध्ये सतत बंधुत्वाची भावना वाढविणे.

(झ) परस्परांना साहाय्य करण्याचा व वैयक्तिक आणि सामूहिक कार्यात सुधारणा घडवून आणण्याचा हेतू नजरेसमोर ठेवून टीका व आत्मटीका करणे.

(ञ) पक्षाशी खुल्या दिलाने, प्रामाणिकपणे व सचोटीने वागणे आणि पक्षाचा विश्वासघात न करणे.

(ट) पक्षातील एकजूट व एकसंधपणा यांचे रक्षण करणे आणि पक्षाच्या, कामगारवर्गाच्या व देशाच्या शत्रूंविरुद्ध जागरूक राहणे.

(ठ) पक्ष, कामगारवर्ग व देश यांच्या शत्रूंच्या हल्ल्यांना तोंड देऊन पक्षाचे रक्षण करणे आणि पक्षाच्या ध्येयाचा झेंडा उचलून धरणे.

(ड) भारतीय जनतेच्या थोर परंपरा, इतिहास व तिचा सांस्कृतिक वारसा यांविषयीचा आपला समज सखोल करणे.

२. प्रत्येक पक्ष-घटक, प्रत्येक सभासद, प्रत्येक उमेदवार पक्षविरोधी प्रभावापासून, गटबाजीपासून पक्षाचे रक्षण करील व मार्क्सवादी-लेनिनवादी तत्त्वांच्या आधारे पक्षाचे ऐक्य व शुद्धता यासाठी कार्य करील. गट बनवून किंवा अन्य प्रकारच्या फुटपाड्या कार्याद्वारे पक्षाचे ऐक्य नष्ट करणाऱ्या कामगारवर्गाच्या शत्रूंना आळा घालण्यासाठी पक्ष-सभासद नेहमी जागरूक राहतील.

३. पक्ष-सभासदांकडून वरील कर्तव्यांचे पालन करून घेणे आणि ती पार पाडण्यात त्यांना शक्य त्या सर्व प्रकारे मदत करणे हे पक्ष-संघटनेचे कार्य राहील.

## कलम १३
## पक्षसभासदांचे हक्क

१. पक्ष-सभासदांचे हक्क खालीलप्रमाणे आहेत :

(क) पक्षाच्या कार्यकारी घटकांची व कमिट्यांची निवड करणे व त्यांवर निवडून येणे.

(ख) पक्षाचे धोरण व पक्षाचे निर्णय यांची आखणी करण्याच्या कामी मदत करण्यासाठी चर्चेत मोकळेपणाने भाग घेणे.

(ग) पक्षातील स्वत:च्या कार्याच्या बाबतीत सूचना करणे, आपली कर्तृत्वशक्ती व जीवनातील स्थान यांना अनुसरून स्वत:चे काम नेमून घेणे.

(घ) पक्षाच्या सभांत पक्षघटक व पक्षाचे कार्यकर्ते यांच्यासंबंधी टीका करणे; ज्या कॉम्रेडवर किंवा पक्ष-घटकावर ही टीका झाली असेल त्याच्याकडे ती आणि त्याच्याकडून काही उत्तर आल्यास ते उत्तर संबंधित पक्ष-घटकाकडे पाठविले जाईल.

(ङ) एखादा पक्ष-घटक किंवा पक्ष-संघटना एखाद्या पक्ष-सभासदाविरुद्ध शिस्तीचा इलाज योजण्याविषयी चर्चा करीत असेल, किंवा एखाद्या पक्ष-सभासदाने गंभीर चुका केल्याच्या संशयावरून त्यासंबंधात त्याच्या किंवा



तिच्या वैयक्तिक वर्तनाचे किंवा कामाचे मूल्यमापन करीत असेल तर अशा वेळी स्वत:ची बाजू समक्ष मांडण्याची मागणी करणे.

(च) एखाद्या पक्ष-घटकाचा किंवा संघटनेचा एखादा निर्णय एखाद्या पक्ष-सभासदास मान्य नसेल, तर त्याला किंवा तिला वरिष्ठ कमिटीसमोर, राष्ट्रीय कौन्सिल आणि पक्षाची कॉंग्रेस यांच्यासमोरदेखील, आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. अर्थात अशा सर्व प्रकरणांत त्या पक्ष-सभासदाला पक्षाचे निर्णय अमलात आणावेच लागतील आणि प्रत्यक्ष व्यवहाराची कसोटी लावून व भ्रातृत्वयुक्त चर्चा करून मतभेद सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

(छ) कोणत्याही वरिष्ठ पक्ष-संघटनेकडे, राष्ट्रीय कौन्सिल आणि पक्षकॉंग्रेस यांच्याकडेसुद्धा, कोणतेही निवेदन, अपील किंवा तक्रार पाठविणे आणि अपिलाचे उत्तर मिळणे वा आपल्या तक्रारीचे निवारण करून घेणे.

२. या अधिकाराबाबत आदर बाळगला जातो हे पाहणे पक्ष-घटक व कार्यकर्ते यांचे कर्तव्य राहील.

## कलम १४
## लोकशाही मध्यवर्तित्वाची तत्त्वे

१. भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा आपली पक्ष-संघटना तसेच आपले कार्य लोकशाही मध्यवर्तित्वावर व पक्षांतर्गत संपूर्ण लोकशाहीवर आधारून करतो.

पक्षरचनेच्या क्षेत्रात मार्गदर्शक अशी लोकशाही मध्यवर्तित्वाची पुढील तत्त्वे आहेत :



(क) वरपासून खालपर्यंतच्या पक्षाच्या सर्व पुढाकार देणाऱ्या संघटना गुप्त मतदान पद्धतीच्या मार्गाने निवडल्या जातील, पक्षनेतृत्व अखंड राखणे, तसेच नव्या सभासदांना नेतृत्वात बढतीची हमी मिळेल अशी व्यवस्था करणे हे तत्त्व पक्षात सर्वत्र सतत लागू केले जाईल.

(ख) अल्पसंख्यांकांनी बहुसंख्याकांचे निर्णय अमलात आणले पाहिजेत; खालच्या पक्ष-संघटनांनी पक्षाच्या वरिष्ठ कार्यकारी घटकांचे किंवा घटकांचे निर्णय, आदेश अमलात आणले पाहिजेत. व्यक्तीने सामुदायिक इच्छेपुढे मान तुकविली पाहिजे. सर्व संघटनांनी पक्षकॉंग्रेस आणि राष्ट्रीय कौन्सिल यांचे निर्णय व आदेश अमलात आणले पाहिजेत.

(ग) सर्व पक्ष-संघटकांनी नियमित कालांतराने आपल्या कार्याचा वृत्तान्त निकटच्या कनिष्ठ पक्ष-घटकांस दिला पाहिजे आणि त्याचप्रमाणे सर्व कनिष्ठ पक्ष-घटकांनी आपल्या कार्याचा अहवाल निकटच्या वरिष्ठ घटकांना सादर केला पाहिजे.

(घ) सर्व पक्ष-घटकांनी, विशेषत: नेतृत्व करणाऱ्या पक्ष-घटकांनी, खालच्या पक्ष-संघटनांच्या आणि सर्वसाधारण पक्ष-सभासदांच्या मतांकडे व टीकेकडे सतत लक्ष पुरविले पाहिजे आणि त्यांनी मांडलेल्या प्रश्नांचा शक्यतो लवकर योग्य विचार केला पाहिजे.

(ङ) सर्व पक्ष-घटकांनी काटेकोरपणे सामुदायिक निर्णयांच्या



व तपासणीच्या (चेकअप) तत्त्वांना वैयक्तिक जबाबदारीची जोड देऊन आपला कारभार चालविला पाहिजे.

(च) आंतरराष्ट्रीय परिस्थितीसंबंधीचे सर्व प्रश्न, अखिल भारतीय स्वरूपाचे प्रश्न, किंवा एकापेक्षा अधिक राज्यांविषयीचे प्रश्न अगर संपूर्ण देशासाठी एकाच स्वरूपाचे निर्णय घेण्याची आवश्यकता असलेले प्रश्न अशा सर्व प्रश्नांवरील निर्णय अखिल भारतीय स्वरूपाच्या पक्ष-संघटना घेतील. एखादे राज्य अगर जिल्हा यांच्या स्वरुपाचे सर्व प्रश्न साधारणपणे त्या त्या पातळीवरील पक्ष-संघटना सोडवील. पण हे निर्णय कोणत्याही परिस्थितीत वरिष्ठ पक्ष-संघटनेने घेतलेल्या निर्णयांशी विसंगत असता कामा नयेत. राज्यस्वरूप असलेल्या महत्त्वाच्या कोणत्याही प्रश्नावर मध्यवर्ती पक्षपुढारीपणाला जेव्हा एखादा निर्णय घ्यावयाचा असेल तेव्हा तो 'संबंधित राज्य पक्षसंघटनेशी' विचारविनिमय केल्यावरच असा निर्णय घेईल. राज्य संघटना जिल्ह्यांच्या बाबतीत हाच संकेत पाळील.

(छ) पक्षाच्या अखिल भारतीय स्वरूपाच्या धोरणाशी संबंधित असलेल्या, पण ज्यांच्याविषयी पक्षाची भूमिका पहिल्याप्रथमच पुढे मांडली जावयाची आहे, अशा प्रश्नांवर फक्त पक्षाच्या मध्यवर्ती पुढारीपणालाच धोरणाचे निवेदन करण्याचा अधिकार आहे. खालच्या घटकांना मध्यवर्ती पुढारीपणाच्या विचारासाठी आपली मते व सूचना पाठविता येतील आणि त्या त्यांनी वेळेवर पाठवाव्यात.

२. सबंध पक्ष-सभासदांच्या आणि जन-आंदोलनांच्या अनुभवाच्या आधारावर पक्षाच्या अंतर्गत जीवनातील क्षेत्रात लोकशाही मध्यवर्तित्वाची पुढील मार्गदर्शक तत्त्वे लागू केली जातात :

(क) पक्ष, त्याचे धोरण आणि कार्य यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व प्रश्नांवर पक्षाच्या घटकात मुक्त व मनमोकळी चर्चा करणे.

(ख) पक्षाची धोरणे लोकप्रिय करण्याकरिता व त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता पक्ष-सभादांना कार्यान्वित करण्यासाठी, त्यांना पक्षाच्या जीवनात व कार्यात परिणामकारकरीत्या भाग घेता यावा म्हणून त्यांची वैचारिक-राजकीय पातळी वाढविण्यासाठी आणि त्यांच्या सर्वसाधारण शिक्षणात भर घालण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करणे.

(ग) जेव्हा एखाद्या पक्ष-घटकात गंभीर स्वरूपाचे मतभेद निर्माण होतात, तेव्हा एकवाक्यता घडवून आणण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत; यात यश आले नाही तर निर्णय बहुमताने घ्यावेत.

(घ) प्रश्न जर तातडीच्या निर्णयाची गरज असलेला नसेल, किंवा त्यावर ताबडतोबीची कृती अवलंबून नसेल तर अशी चर्चा बंद करण्याची गरज नाही.

(ङ) महत्त्वाच्या प्रश्नावरील अल्पसंख्य सभासदांचे मत सर्व पक्ष-घटक व पक्ष-सभासद यांना माहिती करून दिले जाईल.



(च) वरपासून खालपर्यंत सर्व पातळ्यांवरील टीकेला व आत्मटिकेला, विशेषत: खालच्या पातळीवरून होणाऱ्या टीकेला, उत्तेजन देणे.

(छ) सर्व पातळ्यावरील नोकरशाही प्रवृत्तीविरुद्ध सुसंगत लढा देणे. पक्ष-घटकाच्या लोकशाही आणि सामुदायिक कार्यपद्धतीची खास जबाबदारी पुढारी कमिट्यांतील सर्व सभासदांवर असेल.

(ज) पक्षात कोणत्याही स्वरूपात गटबाजीला किंवा तशा स्वरूपाचे गट बनविण्यास स्थान न देणे;

(झ) भ्रातृत्वाचे संबंध व परस्परसाहाय्य वाढवून पक्षबाणा दृढ करणे. कॉम्रेड्सना सहानुभूतीने वागवून त्यांच्या चुका दुरुस्त करणे; तुरळक चुकांचा किंवा घटनांचा आधार न घेता पक्षसेवेतील त्यांचे एकूण कार्य लक्षात घेऊन त्यांचे आणि त्यांच्या कार्याचे मोजमाप करणे.

## कलम १५
## अखिल भारतीय पक्ष-काँग्रेस

१. सबंध देशासाठी पक्षाचा सर्वोच्च कार्यकारी घटक अखिल भारतीय पक्ष-काँग्रेस हा राहील.

(क) राष्ट्रीय कौन्सिल सर्वसाधारणपणे दर तीन वर्षांतून एकदा नियमित पक्ष-काँग्रेस भरवील. कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे या कामी उशीर झाला तर त्याची कारणे देणारा अहवाल राष्ट्रीय कौन्सिल काँग्रेसपुढे ठेवील.



(ख) राष्ट्रीय कौन्सिलला आवश्यक वाटल्यास किंवा एकूण पक्ष-सभासदांपैकी किमान एकतृतीयांश पक्ष-सभासदांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राज्य-पक्ष-संघटनांनी मागणी केल्यास राष्ट्रीय कौन्सिल खास पक्ष-काँग्रेस भरवील.

(ग) पक्ष-काँग्रेसच्या अगर खास पक्ष-काँग्रेसच्या तारखा व जागा राष्ट्रीय कौन्सिल ठरवील.

(घ) राज्य परिषदांनी, तसेच अखिल भारतीय पक्ष-केंद्राच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली असलेल्या पक्ष-घटकांच्या परिषदांनी निवडलेले प्रतिनिधी नियमित पक्ष-काँग्रेसमध्ये भाग घेतील.

(ङ) पक्ष-काँग्रेसमधील प्रतिनिधित्वाचे प्रमाण राष्ट्रीय कौन्सिल ठरवील.

(च) खास पक्ष-काँग्रेससाठी निवडावयाच्या प्रतिनिधींचे प्रमाण आणि प्रतिनिधी निवडावयाची पद्धत राष्ट्रीय कौन्सिल ठरवील.

(छ) राष्ट्रीय कार्यकारिणीच्या व मध्यवर्ती कंट्रोल कमिशनच्या सभासदांना नियमित किंवा खास पक्ष-काँग्रेसमध्ये पूर्ण प्रतिनिधी म्हणून भाग घेण्याचा अधिकार राहील. राष्ट्रीय कौन्सिलच्या इतर सभासदांना, ते प्रतिनिधी म्हणून निवडून न आल्यास, मतदानाचा हक्क नसलेले प्रतिनिधी या नात्याने पक्ष-काँग्रेसमध्ये भाग घेता येईल.

(ज) एखाद्या राज्यातील ज्या सभासदसंख्येवर पक्ष-सभासदत्वाच्या वर्गणीचा राष्ट्रीय कौन्सिलचा वाटा



संपूर्णपणे भरण्यात आला असेल आणि ती राष्ट्रीय समितीने मान्य केली असेल तीच सभासदसंख्या त्या राज्यातून पक्ष-काँग्रेससाठी निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या ठरविण्यासाठी आधारभूत समजली जाईल.

२. नियमित पक्ष-काँग्रेसचे कार्य व अधिकार खालीलप्रमाणे आहेत :

(क) राष्ट्रीय कौन्सिलच्या राजकीय आणि संघटनात्मक अहवालावर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(ख) पक्षाचा कार्यक्रम आणि घटना यांच्यात सुधारणा करणे आणि बदल करणे.

(ग) चालू परिस्थितीत पक्षाचे डावपेच व धोरण ठरविणे.

(घ) गुप्त मतदान पद्धतीने मध्यवर्ती कंट्रोल कमिशन निवडणे.

(ङ) गुप्त मतदान पद्धीतीने राष्ट्रीय कौन्सिल निवडणे.

(च) मध्यवर्ती कंट्रोल कमिशनचा अहवाल व अपिले ऐकणे व त्यावर निर्णय घेणे.

(छ) हिशेब तपासनीस मंडळाचा अहवाल ऐकणे व त्यावर निर्णय घेणे.

३. आपले कामकाज चालविण्यासाठी काँग्रेस एक अध्यक्षमंडळ निवडील.

## कलम १६
## राष्ट्रीय कौन्सिल

१. राष्ट्रीय कौन्सिलची निवड पक्ष-काँग्रेस करील; या

कौन्सिलमध्ये नक्की किती सभासद असावेत हे पक्ष-काँग्रेस ठरवेल; पण ही सभासदसंख्या १२५ पेक्षा जास्त असणार नाही. या कौन्सिलमध्ये उमेदवार सभासदही असतील; त्यांची संख्या राष्ट्रीय कौन्सिलच्या पूर्ण सभासदांच्या संख्येच्या १० टक्क्यांहून जास्त असता कामा नये. उमेदवार सभासदांना राष्ट्रीय कौन्सिलच्या बैठकींना हजर राहण्याचा आणि चर्चेत भाग घेण्याचा हक्क राहील; मात्र मतदानाचा हक्क असणार नाही.

(क) मावळते राष्ट्रीय कौन्सिल काँग्रेसला नव्या राष्ट्रीय कौन्सिलच्या उमेदवारांची यादी सुचवील.

(ख) जनतेशी निकट संबंध असलेले, कामगारवर्गाच्या क्रांतिकारक दृष्टिकोनावर अढळ असलेले आणि मार्क्सवाद-लेनिनवादाचा अभ्यास केलेले असे विशाल पाया असलेले लायक पुढारीपण निर्माण करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची ही यादी तयार केली जाईल. या यादीत सर्व राज्ये, जन-आघाड्या आणि पक्षाच्या कार्याची इतर क्षेत्रे यांतील सर्वोत्कृष्ट बुद्धिमान व अनुभवी कार्यकर्त्यांना एकत्र आणले जाईल आणि प्रत्येक राज्यातून कमीतकमी एक प्रतिनिधी घेतला जाईल. (अशा यादीत स्त्रिया,कामगारवर्ग, तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागासवर्गीय यांना पूर्णपणे भरीव प्रतिनिधित्व दिले जाईल याकडे खास लक्ष पुरविले गेले पाहिजे.)



(ग) उमेदवारांच्या यादीतील किमान एकपंचमांश नावे मावळत्या राष्ट्रीय कौन्सिलचे सभासद नव्हते, अशा व्यक्तींची असली पाहिजे.

(घ) अशा रीतीने सुचविलेल्या यादीतील कोणत्याही नावाला कोणत्याही प्रतिनिधीला हरकत घेता येईल; तसेच कुणाचेही नाव किंवा नावे नव्याने सुचविता येतील.

(ङ) ज्याचे किंवा जिचे नाव सुचविले गेले असेल त्याला किंवा तिला ते परत घेण्याचा हक्क राहील.

(च) अशी रीतीने शेवटी तयार झालेली यादी, प्रतिनिधींनी सुचविलेल्या जादा नावासह मताला टाकली जाईल, मतदान गुप्त पद्धतीने होईल व प्रत्येक प्रतिनिधीला 'एका उमेदवारास एकच मत' देता येईल.

२. राष्ट्रीय कौन्सिलवरील कोणत्याही जागा खाली झाल्यास त्या भरून काढण्यासाठी सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार राष्ट्रीय कौन्सिलला राहील; मात्र अशा स्वीकृत सभासदांची संख्या कौन्सिलच्या सभासदसंख्येच्या दहा टक्क्यांहून जास्त असता कामा नये आणि कौन्सिलच्या त्या बैठकीला हजर असलेल्या सभासदांपैकी दोनतृतीयांश सभासदांनी या सूचनेच्या बाजूने मते टाकली तरच ती स्वीकृती ग्राह्य ठरेल.

राष्ट्रीय कौन्सिलमधील रिकाम्या जागा सर्वसाधारणपणे उमेदवार सभासदांतून भरल्या जातील.



राष्ट्रीय कौन्सिलवरील उमेदवार सभासदांच्या कोणत्याही जागा खाली झाल्यास त्या भरून काढण्यासाठी उमेदवार सभासद स्वीकृत करण्याचाही अधिकार राष्ट्रीय कौन्सिलला राहील; मात्र कौन्सिलच्या त्या बैठकीला हजर असलेल्या सभासदांपैकी दोनतृतीयांश सभासदांनी या सूचनेच्या बाजूने मते टाकली तरच ती स्वीकृती ग्राह्य ठरेल.

## कलम १७
## राष्ट्रीय कौन्सिलची कार्ये

१. दोन अखिल भारतीय पक्ष-काँग्रेसच्या दरम्यानच्या काळात राष्ट्रीय कौन्सिल ही पक्षाची सर्वोच्च अधिकारी संघटना समजली जाईल.

२. पक्षाची घटना कार्यान्वित करणे व पक्ष-काँग्रेसने संमत केलेले राजकीय धोरण आणि निर्णय अंमलात आणणे ही राष्ट्रीय कौन्सिलची जबाबदारी राहील.

३. राष्ट्रीय कौन्सिल एकंदर पक्षाचे प्रतिनिधित्व करील आणि पक्षाच्या एकूण कार्याचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्याच्यावर राहील. पक्षापुढे असलेल्या कोणत्याही प्रश्नावर संपूर्ण अधिकारवाणीने निर्णय घेण्याचा राष्ट्रीय कौन्सिलला हक्क राहील.

४. राष्ट्रीय कौन्सिलच्या दोन अधिवेशनांच्या दरम्यानच्या काळात तिचे कार्य चालविण्यासाठी ती आपल्या सभासदांतून एक राष्ट्रीय कार्यकारिणी निवडील; या कार्यकारिणीचे सभासद ३१ पेक्षा जास्त असणार नाहीत. राष्ट्रीय कौन्सिल राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सभासदांतून सरचिटणीस, चिटणीस आणि



आवश्यक वाटल्यास एक उपसरचिटणीस निवडेल. कार्यकारिणीचे पॅनेल पूर्वीची राष्ट्रीय कार्यकारिणी सुचवेल.

अशा सर्वांचे मिळून राष्ट्रीय सचिव मंडळ असेल. त्याची संख्या ९ पेक्षा जास्त असणार नाही.

राष्ट्रीय कार्यकारिणीचे पॅनेल पूर्वीची राष्ट्रीय कार्यकारिणी सुचवेल. राष्ट्रीय सचिव मंडळ (सरचिटणीस, चिटणीस व असल्यास उपसरचिटणीस) यांचे पॅनेल राष्ट्रीय नवी कार्यकारिणी सुचवेल.

५. जितके सभासद निवडायचे तेवढ्याच किंवा जास्त संख्येची नावे पॅनेलमध्ये असू शकतील. हे सूचक कमिटीने ठरवायचे आहे. प्रतिनिधींनी सभागृहातून सुचविलेली नावे घेऊन एकूण यादी मताला टाकली जाईल. ही यादी नावांच्या आद्याक्षराप्रमाणे बनवली जाईल. हीच गोष्ट खालील पातळीवरही लागू आहे.

६. राष्ट्रीय कौन्सिल एक खजीनदार निवडील.वाटल्यास तिने एक मदतगार खजीनदारही निवडावा. त्याचबरोबर ती हिशेब तपासण्यासाठी एका हिशेबतपासनीस मंडळाची (ऑडिट कमिशनची) निवड करील. हे मंडळ राष्ट्रीय कौन्सिलला आपला अहवाल दरवर्षी सादर करील.

७. राष्ट्रीय कार्यकारिणीवरील रिकाम्या झालेल्या जागा भरण्याचा आणि या कार्यकारिणीच्या कोणत्याही सभासदाला दूर करण्याचा किंवा त्याची पुनर्घटना करण्याचा राष्ट्रीय कौन्सिलला हक्क राहील.

८. मध्यवर्ती कंट्रोल कमिशनवरील कोणतीही जागा रिकामी

झाली तर ती राष्ट्रीय कौन्सिल भरून काढील.

९. राष्ट्रीय कौन्सिलची बैठक दर सहा महिन्यांतून निदान एकदा किंवा एकंदर सभासदांपैकी एकतृतीयांश सभासद ज्यावेळी मागणी करतील त्यावेळी भरेल.

१०. मध्यवर्ती कार्यकारिणीने सादर केलेला राजकीय व संघटनात्मक अहवाल आणि इतर बाबी यांवर राष्ट्रीय कौन्सिल चर्चा करील व निर्णय घेईल. राष्ट्रीय कौन्सिल आपल्या बैठकीत इतर कोणतीही सूचना किंवा प्रश्न चर्चेला घेण्याचे ठरवू शकेल.

११. राष्ट्रीय कौन्सिल आपला राजकीय अहवाल आणि संघटनात्मक अहवाल, तसेच हिशेबतपासनीस मंडळाचा अहवाल पक्ष-काँग्रेस जेव्हा जेव्हा भरेल तेव्हा तिला सादर करील.

## कलम १८
## राष्ट्रीय कार्यकारिणी

१. राष्ट्रीय कौन्सिलच्या दोन अधिवेशनांच्या दरम्यानच्या काळात राष्ट्रीय कार्यकारिणी पक्षाच्या कार्याचे मार्गदर्शन करील. राष्ट्रीय कौन्सिलचे निर्णय व आदेश अमलात आणण्याची जबाबदारी तिची राहील. कोणत्याही राजकीय आणि संघटनात्मक प्रश्नावर, तसेच जनता चळवळीसंबंधीच्या प्रश्नावर ती निर्णय घेईल आणि राज्य कौन्सिलांना मार्गदर्शन करील. राष्ट्रीय कार्यकारिणी आपल्या कार्याचा आणि चर्चेचा अहवाल राष्ट्रीय कौन्सिलच्या पुढच्या बैठकीत सादर करील.



२. राष्ट्रीय कौन्सिलच्या वतीने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडीत असताना राष्ट्रीय कार्यकारिणी पुढील कार्ये करील :

(क) राष्ट्रीय कौन्सिलच्या नियमितपणे बैठकी बोलावणे, या बैठकीसाठी अहवाल आणि ठराव तयार करणे व राष्ट्रीय कौन्सिलच्या बैठकीच्या तारखेपूर्वी कमीतकमी एक आठवडा अगोदर हे अहवाल व ठराव त्याच्या सभासदांकडे पाठविणे.

(ख) राज्य कौन्सिलांना मार्गदर्शन व मदत करणे.

(ग) पक्षाच्या वृत्तपत्रांना व प्रकाशनांना मार्गदर्शन करणे.

(घ) संसदेतील कम्युनिस्ट गटाचे मार्गदर्शन करणे.

(ङ) अखिल भारतीय स्वरूपाच्या जनसंघटनांतील (किंवा जनता आघाड्यांवरील) पक्षाच्या कार्याचे मार्गदर्शन करणे.

(च) पक्षशिक्षण संघटित करणे.

(छ) पक्षाच्या अर्थपुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे.

(ज) भ्रातृपक्षांशी संबंध राखणे.

३. राष्ट्रीय कार्यकारिणीच्या वतीने दैनंदिन मार्गदर्शन व कार्य करणे हे सरचिटणीस व राष्ट्रीय सचिव मंडळाचे काम राहील.

४. राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक किमान दोन महिन्यांतून एकदा होईल. राष्ट्रीय कार्यकारिणीच्या वतीने विशिष्ट कार्ये पार पाडण्यासाठी खाती व कमिट्या निवडील. राष्ट्रीय कार्यकारिणीने ठरवलेल्या मार्गदर्शक सूत्राप्रमाणे खाती व कमिट्या काम करतील.



## कलम १९
## राज्य कार्यकारी पक्ष-घटक

१. राज्यातील सर्वोच्च घटक राज्य पक्षपरिषद (कॉन्फरन्स) हा असेल.

२. नियमित राज्य परिषद दर तीन वर्षांतून एकदा राज्य कौन्सिलकडून भरविली जाईल.

३. राज्य कौन्सिलला आवश्यक वाटल्यास अगर किमान एकतृतीयांश पक्ष-सभासदांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्ष-घटकांनी ही मागणी केल्यास राज्य कौन्सिल खास राज्य परिषद बोलावील.

४. नियमित राज्य परिषद जिल्हा परिषदांनी आणि राज्य कार्यकारिणीच्या प्रत्यक्ष अंमलाखाली कार्य करणारे काही पक्ष-घटक असल्यास त्याच्या परिषदेने निवडलेले प्रतिनिधी यांनी बनलेली असेल.

५. राज्य परिषदेतील प्रतिनिधित्वाचे प्रमाण राज्य कौन्सिल ठरवील.

६. खास राज्य परिषदेतील प्रतिनिधित्वाच्या प्रमाणाचा पाया कोणता असावा आणि प्रतिनिधींची निवडणूक कोणत्या पद्धतीने घ्यावी हे राज्य कौन्सिल ठरवील.

७. नियमित किंवा खास परिषदेत राज्य कार्यकारिणीच्या व राज्य कंट्रोल कमिशनच्या सभासदांना पूर्ण प्रतिनिधी म्हणून भाग घेण्याचा हक्क राहील. राज्य कौन्सिलचे सभासद, ते प्रतिनिधी म्हणून निवडून न आल्यास, मताधिकार नसलेले



प्रतिनिधी या नात्याने या परिषदेत भाग घेतील.

८. एखाद्या जिल्ह्यातील ज्या सभासदसंख्येवर पक्ष-सभासदत्वाच्या वर्गणीचा राज्य कौन्सिलचा वाटा पूर्णपणे भरण्यात आला असेल व जी राज्य कौन्सिलने मान्य केली असेल तीच सभासदसंख्या त्या जिल्ह्यातून राज्य परिषदेसाठी निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या ठरविण्यासाठी आधारभूत समजली जाईल.

९. राज्य परिषदेची नियमित कार्ये आणि अधिकार पुढीलप्रमाणे आहेत :

(क) राज्य कौन्सिलने सादर केलेल्या राजकीय व संघटनात्मक अहवालावर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(ख) पक्ष-काँग्रेस आणि राष्ट्रीय कौन्सिल यांनी ठरवून दिलेल्या धोरणांनुसार राज्यातील पक्षाच्या व जनतेमधील कार्याचे धोरण व दिशा आखणे आणि पक्षाच्या अखिल भारतीय धोरणात आणि पक्षाच्या सर्वसाधारण धोरणात बदल सुचविणे.

(ग) अखिल भारतीय पक्ष-काँग्रेससाठी प्रतिनिधी निवडणे.

(घ) राज्य कंट्रोल कमिशन निवडणे.

(ङ) राज्य कौन्सिल निवडणे.

(च) राज्याच्या हिशेबतपासनीस मंडळाचा अहवाल ऐकणे व त्यावर निर्णय घेणे.

(छ) राज्याच्या कंट्रोल कमिशनचा अहवाल ऐकणे व त्यावर निर्णय घेणे.

(ज) आपले कामकाज चालविण्यासाठी राज्य परिषद एक अध्यक्षमंडळ निवडील.

## कलम २०
## राज्य कौन्सिल

१. राज्य कौन्सिलची निवड राज्य पक्षपरिषद करील. तिची सभासदसंख्या १२५ पेक्षा जास्त असता कामा नये. या कौन्सिलमध्ये नक्की किती सभासद असावेत हे पक्ष परिषद ठरवील. कौन्सिलमध्ये उमेदवार सभासदही असतील; त्यांची संख्या राज्य कौन्सिलच्या पूर्ण सभासदांच्या संख्येच्या १० टक्क्यांहून जास्त असणार नाही. उमेदवार सभासदांना राज्य कौन्सिलच्या बैठकींना हजर राहण्याचा आणि तिच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क राहील; पण मतदानाचा हक्क असणार नाही.

२. मावळते राज्य कौन्सिल उमेदवारांची यादी सुचवेल.

३. उमेदवारांची ही यादी राज्यातील जनतेच्या वाढत्या चळवळीच्या आणि पक्षाच्या वाढत्या कार्याच्या गरजा पुरविण्यासाठी पुढारीपण निर्माण करण्याच्या दृष्टीने तयार केली जाईल; पण कलम १६ मधील पोटकलम (ख) मध्ये व्यक्त केलेला सर्वसाधारण दृष्टिकोन लक्षात ठेवून केली जाईल.

४. या परिषदेत राज्य कौन्सिलच्या निवडणुकीबाबत कलम १६ मधील पोटकलम (घ) ते (च) यांतील नियम व तत्त्वे लागू पडतील.



५. दोन पक्षपरिषदांच्या मधल्या काळात राज्य कौन्सिल हीच राज्यातील सर्वोच्च अधिकारी पक्षसंघटना असेल.

६. राज्य कौन्सिल ही एकंदर राज्याची प्रातिनिधिक पक्ष-संघटना असेल आणि दोन परिषदांच्या दरम्यानच्या काळात ती पक्षाच्या कार्याचे मार्गदर्शन करण्यास जबाबदार राहील. राज्य स्वरूपाच्या प्रश्नांवर संपूर्ण अधिकारवाणीने निर्णय घेण्याचा कौन्सिलला हक्क राहील; पण हे निर्णय पक्ष-काँग्रेस आणि राष्ट्रीय कौन्सिल यांनी घालून दिलेल्या धोरणांशी सुसंगत असले पाहिजेत.

७. राज्य कौन्सिलच्या दोन बैठकांच्या दरम्यानच्या काळात आपले काम चालविण्यासाठी कौन्सिल आपल्या सभासदांतून एक राज्य कार्यकारिणी निवडील; या कार्यकारिणीवर ३१ पेक्षा जास्त सभासद असणार नाहीत. ते राज्य कार्यकारिणीच्या सभासदांतून एक चिटणीसही निवडील. एक किंवा दोन उपचिटणीसही ती निवडू शकते. राज्य कार्यकारिणी सभासदांतून नावांच्या याद्या जुनी राज्य कार्यकारिणी सुचवील. आवश्यक तेथे ९ जणांचे सचिव मंडळ निवडेल.

८. राज्य कार्यकारिणीवरील रिकाम्या झालेल्या जागा भरण्याचा किंवा कोणत्याही सभासदाला या कार्यकरिणीतून कमी करण्याचा अगर कार्यकारिणीची पुनर्घटना करण्याचा राज्य कौन्सिलला हक्क राहील.

९. प्रांतिक कंट्रोल कमिशनवरील कोणतीही जागा रिकामी झाल्यास ती राज्य कौन्सिल भरेल.

१०. राज्य कौन्सिलची बैठक चार महिन्यांतून कमीतकमी



एकदा किंवा तिच्या एक-तृतीयांश सभासदांनी मागणी केल्यास (रिक्विझिशन) त्या अगोदर भरेल.

११. राज्य कार्यकारिणीने सादर केलेला राजकीय व संघटनात्मक अहवाल आणि इतर बाबी, यांवर राज्य कौन्सिल चर्चा करील व निर्णय घेईल. हे कौन्सिल इतर कोणताही प्रश्न विचारात घेऊ शकेल.

१२. राज्य कौन्सिल एक खजिनदार निवडेल. त्याचप्रमाणे हिशेब तपासण्यासाठी आणि त्यावरील आपला अहवाल सादर करण्यासाठी एक हिशेबतपासनीस मंडळाचीही निवड करील. हा अहवाल दर वर्षी राज्य कौन्सिलकडे आणि पक्षपरिषदेकडे पाठविला जाईल.

१३. राज्य कौन्सिलवरील कोणत्याही जागा खाली झाल्यास राज्य कौन्सिलला त्या भरून काढण्यासाठी सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार राहील; मात्र अशा स्वीकृत सभासदांची संख्या कौन्सिलच्या सभासदसंख्येच्या दहा टक्क्यांहून जास्त असता कामा नये आणि बैठकीला हजर असलेल्या सभासदांपैकी दोनतृतीयांश सभासदांची मते या सूचनेला अनुकूल पडली तरच ती स्वीकृती ग्राह्य ठरेल.

१४. राज्य कौन्सिलवरील उमेदवार सभासदांच्या कोणत्याही जागा खाली झाल्यास त्या भरून काढण्यासाठी उमेदवार सभासद स्वीकृत करण्याचाही अधिकार राज्य कौन्सिलला राहील. मात्र कौन्सिलच्या त्या बैठकीला हजर असलेल्या सभासदांपैकी दोन-तृतीयांश सभासदांनी या सूचनेच्या बाजूने मते टाकली तरच ती स्वीकृती ग्राह्य ठरेल.



## कलम २१
## राज्य कार्यकारिणी

१. राज्य कार्यकारिणी राज्य कौन्सिलच्या दोन अधिवेशनांच्या दरम्यानच्या काळात राज्य पक्षाच्या कार्यकारी घटकांच्या कार्याचे मार्गदर्शन करील. ती राज्य कौन्सिलचे व त्याहून वरिष्ठ संघटनांचे निर्णय व आदेश अमलात आणण्यासाठी जबाबदार राहील. ती कोणत्याही राजकीय व संघटनात्मक प्रश्नांवर, तसेच जनता चळवळीच्या प्रश्नांवर निर्णय घेईल आणि त्यासंबंधीचा अहवाल राज्य कौन्सिलपुढे ठेवील.

२. राज्य कौन्सिलच्या वतीने या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी राज्य कार्यकारिणी पुढील कार्ये करील :

(क) राज्य कौन्सिलच्या नियमित बैठकी बोलावणे आणि या बैठकींसाठी अहवाल व ठराव तयार करणे.

(ख) जिल्हा कौन्सिल्सना मार्गदर्शन करणे व त्यांना मदत करणे.

(ग) राज्य पक्ष-वृत्तपत्रांना व प्रकाशनांना मार्गदर्शन करणे.

(घ) राज्य विधानसभा, रीजनल कौन्सिल्स, नगरपालिका आणि इतर स्थानिक संस्था यांचे सभासद असलेल्या पक्ष-सभासदांच्या कार्याला दिशा देणे.

(ङ) जनसंघटनांतील पक्षाच्या कार्याला दिशा देणे.

(च) पक्षातील शैक्षणिक कार्य संघटित करणे.

(छ) पक्षाच्या अर्थपुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे.

३. सर्वसाधारणपणे राज्य कार्यकारिणीची बैठक महिन्यातून एकदा भरेल.

४. राज्य कार्यकारिणीचे काम सांभाळण्यासाठी राज्य कार्यकारिणी आपल्या वतीने विशिष्ट कामे पार पाडण्यासाठी, खाती आणि कमिट्या मुक्रर करेल. हे घटक कार्यकारिणीच्या मार्गदर्शनाखाली काम करतील.

५. राज्य कार्यकारिणी पक्षाच्या आर्थिक बाजूसाठी सेक्रेटरी, खजीनदार यासह ५ जणांची एक अर्थ उपसमिती नेमेल. ती समिती पक्षाच्या पैशावर नियंत्रण ठेवण्यास, त्याचे व्यवहार पाहण्यास कार्यकारिणीला मदत करेल.

## कलम २२
## पक्षाचे जिल्ह्यातील कार्यकारी घटक

१. जिल्हा पक्ष-परिषद ही जिल्ह्यातील सर्वोच्च कार्यकारी घटक असेल.

२. दर तीन वर्षांतून एकदा जिल्हा कौन्सिल जिल्हा पक्षपरिषद भरवेल.

३. जिल्हा कौन्सिलला आवश्यक वाटल्यास किंवा किमान एक-तृतीयांश सभासदांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या पक्षघटकांनी मागणी केल्यास जिल्हा कौन्सिल खास जिल्हा परिषद बोलावेल; पण त्यासाठी राज्य कार्यकारिणीची अनुमती घ्यावी लागेल.

४. नियमित जिल्हा पक्ष-परिषद शाखा परिषदांनी किंवा जेथे दरम्यानचे स्थानिक घटक असतील तेथे त्यांच्या परिषदांनी



निवडलेल्या प्रतिनिधींची बनलेली असेल.

५. जिल्हा परिषदेतील प्रतिनिधित्वाचे प्रमाण जिल्हा कौन्सिल ठरवेल.

६. खास जिल्हा परिषदेतील प्रतिनिधित्वाच्या प्रमाणाचा पाया कोणता असावा व निवडणुकीची पद्धत कोणती असावी यावर जिल्हा कौन्सिल निर्णय घेईल.

७. जिल्हा सेक्रेटरीएटच्या किंवा कार्यकारिणीच्या (जसे असेल त्याप्रमाणे) सभासदांना नियमित तसेच खास जिल्हा परिषदेत पूर्ण प्रतिनिधी म्हणून भाग घेण्याचा हक्क राहील. जिल्हा कौन्सिलचे सभासद, ते प्रतिनिधी म्हणून निवडून न आल्यास, मताधिकार नसलेले प्रतिनिधी या नात्याने या परिषदेत भाग घेतील.

८. एखाद्या शाखा किंवा स्थानिक संघटनेतील ज्या सभासदसंख्येवर पक्ष-सभासदत्वाच्या वर्गणीचा जिल्हा कौन्सिलचा वाटा पूर्णपणे भरण्यात आला असेल व ती जिल्हा कौन्सिलने मान्य केली असेल, तीच सभासदसंख्या त्या शाखा किंवा स्थानिक घटकांतून जिल्हा परिषदेसाठी निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या ठरविण्यासाठी आधारभूत समजली जाईल.

९. नियमित जिल्हा परिषदेची कार्ये आणि अधिकार पुढीलप्रमाणे आहेत :

(क) जिल्हा कौन्सिलने सादर केलेल्या राजकीय व संघटनात्मक अहवालावर चर्चा करणे व त्यावर निर्णय घेणे.



(ख) वरिष्ठ कार्यकारी पक्ष-घटकांनी घेतलेल्या निर्णयांना अनुसरून जिल्ह्यातील पक्षाच्या व जनतेमधील कार्याचे धोरण ठरविणे.

(ग) जिल्हा कौन्सिल निवडणे.

(घ) राज्य परिषदेसाठी प्रतिनिधी निवडणे.

(ङ) जिल्हा हिशेबतपासनीस मंडळाचा अहवाल ऐकणे व त्यावर निर्णय घेणे.

(च) जिल्हा परिषद आपले कामकाज चालविण्यासाठी एक अध्यक्षमंडळ निवडील.

१०. जिल्हा कौन्सिलची निवडणूक जिल्हा परिषद करील. नक्की सभासदसंख्या जिल्हा परिषदच ठरवेल. जिल्हा परिषद जिल्हा कौन्सिलवर काही उमेदवार सभासदही निवडून देईल. त्यांची संख्या समितीच्या पूर्ण सभासदसंख्येच्या दहा टक्के असेल.

११. जिल्हा कौन्सिलच्या निवडणुकीबाबत कलम १६ मधील पोट कलम (ग) ते (च) मध्ये देण्यात आलेले नियम लागू पडतील.

## कलम २३
## जिल्हा कौन्सिल

१. दोन जिल्हा परिषदांच्या मधल्या काळात जिल्हा कौन्सिल ही जिल्ह्यातील सर्वोच्च अधिकारी पक्षसंघटना असेल.

२. जिल्हा कौन्सिल ही एकंदर जिल्ह्याची प्रातिनिधिक



पक्षसंघटना असेल आणि दोन जिल्हा परिषदांच्या दरम्यानच्या काळात ती पक्षाच्या सबंध कार्याचे मार्गदर्शन करील.

३. जिल्हा पक्षसंघटनेच्या कार्याबाबत निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार जिल्हा कौन्सिलला असेल; मात्र हे निर्णय पक्षाच्या धोरणाशी आणि वरिष्ठ कार्यकारी पक्ष-घटकांच्या निर्णयांशी सुसंगत असले पाहिजेत.

४. जिल्हा कौन्सिलच्या दोन बैठकांच्या दरम्यानच्या काळात आपले काम चालविण्यासाठी हे कौन्सिल आपल्या सभासदांतून एक सेक्रेटरीसहित एक जिल्हा सेक्रेटरीएट किंवा जिल्हा कार्यकारिणी निवडेल. एक किंवा दोन मदतनीस चिटणीसही त्याला निवडता येतील. जिल्हा सेक्रेटरीएट किंवा जिल्हा कार्यकारिणीच्या सभासदांची संख्या जिल्हा कौन्सिल ठरवील. जिल्हा कौन्सिल आणि जिल्हा कार्यकारिणी अगर सेक्रेटरीएटच्या सभासदांच्या नावाच्या याद्या अनुक्रमे माजी जिल्हा कौन्सिल, कार्यकारिणी किंवा सेक्रेटरीएट सुचवील.

५. जिल्हा सेक्रेटरीएटवरील किंवा जिल्हा कार्यकारिणीवरील रिकाम्या झालेल्या जागा भरण्याचा आणि कोणत्याही सभासदाला त्यातून कमी करण्याचा किंवा त्याची पुनर्घटना करण्याचा जिल्हा कौन्सिलला अधिकार राहील.

६. जिल्हा कौन्सिलची बैठक दोन महिन्यांतून किमान एकदा तरी भरेल. $^{१}/_{३}$ सभासदांनी मागणी केल्यास अगोदर भरेल.

७. जिल्हा सेक्रेटरीएट किंवा जिल्हा कार्यकारिणीने सादर केलेला राजकीय व संघटनात्मक अहवाल आणि इतर बाबी

यावर जिल्हा कौन्सिल चर्चा करील व निर्णय घेईल. कौन्सिल इतर कोणताही प्रश्न चर्चेसाठी व निर्णयासाठी घेऊ शकेल.

८. जिल्हा कौन्सिल एक खजीनदार निवडेल. हिशेब तपासण्यासाठी आणि त्यावरील आपला अहवाल जिल्हा कौन्सिलकडे दरसाल आणि परिषदेकडे पाठविण्यासाठी जिल्हा कौन्सिल एक हिशेबतपासनीस मंडळही निवडेल.

९. जिल्हा कौन्सिलवरील जागा खाली झाल्यास त्या भरून काढण्यासाठी सभासदांना स्वीकृत करून घेण्याचा अधिकार जिल्हा कौन्सिलकडे राहील. मात्र स्वीकृत सभासदांची संख्या कौन्सिलच्या सभासदसंख्येच्या दहा टक्क्यांहून जास्त असता कामा नये आणि कौन्सिलच्या बैठकीला हजर असणाऱ्या सभासदांपैकी दोन-तृतीयांश सभासदांनी या सूचनेच्या बाजूने मते टाकली तरच ती ग्राह्य ठरेल.

## कलम २४
## जिल्हा सेक्रेटारीएट किंवा कार्यकारिणी

१. जिल्हा कौन्सिलच्या दोन बैठकांदरम्यानच्या काळात जिल्हा सेक्रेटारीएट किंवा जिल्हा कार्यकारिणी जिल्हा पक्षसंघटनेचे कार्य चालवेल. जिल्हा कौन्सिल आणि वरिष्ठ कार्यकारी पक्षघटक यांचे निर्णय व आदेश अमलात आणण्याची जबाबदारी तिची असेल.

२. जिल्ह्यातील कार्याच्या संबंधात निर्माण होणाऱ्या राजकीय आणि संघटनात्मक प्रश्नांवर ती निर्णय घेईल व खालच्या पक्ष-कमिट्यांना मार्गदर्शन करेल. जिल्हा सेक्रेटारीएट किंवा जिल्हा कार्यकारिणी आपल्या जबाबदाऱ्या जिल्हा-कौन्सिल



आणि वरिष्ठ कार्यकारी पक्ष-घटक यांच्या निर्णयांना अनुसरून पार पाडेल.

३. जिल्हा सेक्रेटारीएट किंवा जिल्हा कार्यकारिणीच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील :

(क) जिल्हा कौन्सिलच्या नियमित बैठकी बोलावणे व त्यासाठी अहवाल व ठराव तयार करणे.

(ख) खालच्या घटकांच्या कार्यावर देखरेख ठेवणे. (चेकअप.)

(ग) जनसंघटनांना मार्गदर्शन करणे व त्यांना व्यावहारिक मदत देणे.

(घ) पक्षाची वृत्तपत्रे व वाङ्मय यांचा प्रसार करणे.

(ङ) नगरपालिका आणि इतर स्थानिक संस्थांतील पक्ष-सभासदांच्या कामाचे मार्गदर्शन करणे.

(च) जिल्ह्याच्या अर्थपुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे.

(छ) जिल्ह्यातील पक्षशाळा व पक्षशिक्षण संघटित करणे.

४. ज्या जिल्ह्यात पक्षसभासदांची संख्या मोठी आहे तेथे राज्य कौन्सिल तेथील जिल्हा कौन्सिलला त्याच्या सभासदांतून एक जिल्हा कार्यकारिणी निवडण्याची सवलत देऊ शकेल. असे झाल्यास जिल्हा कौन्सिलच्या दोन बैठकींच्या दरम्यानच्या काळात पक्षाचे कार्य जिल्हा कार्यकारिणी चालवील. जिल्हा कार्यकारिणीवरील सभासदसंख्या जिल्हा कौन्सिलने ठरवायची आहे. असे झाल्यास जिल्हा कौन्सिल हे जिल्हा कार्यकारिणीच्या



सभासदांतून कार्यकारिणीचे चालू काम चालविण्यासाठी एका चिटणीसासहित एक सेक्रेटरीएटही निवडेल.

## कलम २५
## मधले पक्षकार्यकारी घटक

१. राज्य कौन्सिलने निर्णय घेतल्यास पक्षशाखा आणि जिल्हा कौन्सिल यांच्या दरम्यान तालुका कौन्सिल, विभाग कौन्सिल, तहसील कौन्सिल, ब्लॉक कौन्सिल, मौजा कौन्सिल, मंडल कौन्सिल किंवा शहर कौन्सिल असा स्थानिक स्वरूपाचा पक्षकार्यकारी घटक स्थापन करता येईल.

२. अशा स्थानिक पक्ष-घटकाचा किंवा कार्यकारी घटकाचा सर्वोच्च कार्यकारी घटक स्थानिक परिषद असेल व त्या विभागातील शाखा परिषदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी बनलेली असेल. स्थानिक कौन्सिलच्या सभासदांना पूर्ण प्रतिनिधी या नात्याने या परिषदेत भाग घेण्याचा हक्क राहील.

३. स्थानिक आणि शाखापरिषदा दरवर्षी वार्षिक नूतनीकरणाच्या मोहिमेनंतर लगेच भरविण्यात येतील. त्यांचे वेळापत्रक ती ती राज्य कौन्सिल्स ठरवतील.

४. तालुका, विभाग, तहसील, मौजा, मंडल किंवा शहर यातील स्थानिक पक्ष-घटकांची परिषद स्थानिक कौन्सिलची व जिल्हा परिषदेसाठी पाठवावयाच्या प्रतिनिधींची निवड करेल.

५. संबंधित विभागाचे काम चालविणे आणि तिच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली असलेल्या पक्षशाखांच्या कार्यात एकसूत्रीपणा



आणणे ही स्थानिक कौन्सिलची जबाबदारी राहील.

६. स्थानिक कौन्सिल आपला चिटणीस निवडेल आणि एक मदतनीस चिटणीसही तिला निवडता येईल. आणि जरूर वाटल्यास तिला दैनंदिन कार्य चालविण्यासाठी एक कार्यकारिणी किंवा सेक्रेटरीएटही निवडता येईल; मात्र राज्य कार्यकारिणीचा तसा निर्णय असला पाहिजे.

७. स्थानिक कौन्सिल दर महिन्याला आपल्या कार्याचा अहवाल जिल्हा सेक्रेटरीएट किंवा जिल्हा कार्यकारिणीकडे पाठवील.

८. स्थानिक कौन्सिलची बैठक महिन्यातून किमान एकदा तरी भरेल.

९. स्थानिक कौन्सिल हे जिल्हा सेक्रेटरीएट किंवा जिल्हा कार्यकारिणीच्या मार्गदर्शनाखाली काम करेल.

## कलम २६
## जुने जाणते पक्ष-सभासद

ज्या कॉम्रेड्सनी पक्षाची व कामगारवर्गाची दीर्घ-काळ सेवा केली आहे, ते पक्ष-समितीचे सभासद राहिले आहेत, कौन्सिलच्या चर्चेमध्ये ज्यांची भागिदारी उपयुक्त व फायदेशीर ठरेल; पण वयाच्या किंवा आजारपणाच्या कारणाने जे दैनंदिन कार्य करू शकत नाहीत, अशा कॉम्रेड्सना संबंधित पक्ष कौन्सिलच्या बैठकांना कायम निमंत्रित म्हणून बोलवावे. यामुळे त्यांच्या अनुभवांचा व सल्ल्याचा पक्षाला फायदा मिळेल.

## कलम २७
## प्राथमिक घटक

१. पक्षाचा प्राथमिक घटक शाखा हा असेल.

२. शाखेची सर्वसाधारण सभा हा त्या शाखेचा सर्वोच्च कार्यकारी घटक असेल.

३. जनतेशी प्रत्यक्ष दैनंदिन संबंध ठेवणे आणि आपल्या क्षेत्रात पक्षाचे कार्य संघटित करणे ही शाखेची जबाबदारी राहील.

४. पक्षशाखा आपल्या कार्याविषयीच्या आणि जनतेतील कार्याविषयीच्या सर्व प्रश्नांवर चर्चा करेल आणि आवश्यक ते व्यावहारिक निर्णय घेईल.

५. संख्येच्या दृष्टीने सोईस्कर अशा आकाराचे शाखेच्या सभासदांचे गट पाडता येतील. प्रत्येक गटाचा एक स्वत:चा निमंत्रक राहील.

६. सभासदांच्या व्यक्तिगत कामाची वाटणी करणे व त्यांच्या कामावर देखरेख ठेवणे (चेकअप) हे गटाचे कार्य राहील. जरूर तेथे शाखेत राजकीय चर्चा सुकर व्हावी म्हणून प्राथमिक चर्चा गटात संघटित करता येईल.

७. खेडे, पंचायत, म्युनिसिपल वॉर्ड, रस्ता, मोहल्ला, उद्योग, कारखाना, व्यवसाय आणि संस्था, या आधारावर शाखेची संघटना केली जाते. शाखेतील सभासदसंख्येची कमाल मर्यादा राज्य कार्यकारिणी ठरवेल.

८. शाखेची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत :



(क) वरिष्ठ कमिटीच्या आदेशाची अंमलबजावणी करणे.

(ख) पक्षाच्या राजकीय आणि संघटनात्मक निर्णयांना आपल्या विभागातील किंवा कार्यक्षेत्रातील जनतेचा पाठिंबा मिळविणे.

(ग) आपल्या विभागात किंवा कार्यक्षेत्रात जनसंघटना उभारणे व त्यांच्या कार्यात भाग घेणे.

(घ) पक्षाची वृत्तपत्रे व वाङ्मय यांची विक्री करणे.

(ङ) पक्षसभासदत्वाची वर्गणी, लेव्ही व पक्षनिधी गोळा करणे.

(च) पक्षाचे सहानुभूतीदार व लढाऊ अनुयायी यांना पक्षात आणणे व त्यांना शिक्षण देणे आणि निरक्षर पक्षसभासदांना साक्षर होण्यास मदत करणे.

(छ) वरिष्ठ कमिट्यांना दैनंदिन संघटनात्मक आणि प्रचारात्मक कार्यात मदत करणे.

९. पक्षशाखेचे चालू काम पाहण्यासाठी शाखा आपल्या सर्वसाधारण सभेत एक चिटणीस व एक उपचिटणीस यांची निवड करेल आणि जेथे शाखेतील सभासदांची संख्या २५ पेक्षा जास्त असेल तेथे शाखाचिटणीस व उपचिटणीस यांच्यासह शाखा कमिटीची निवड करेल.

१०. शाखेची सर्वसाधारण सभा महिन्यातून कमीतकमी एकदा तरी भरेल. या सभेत शाखा कमिटी किंवा शाखा चिटणीस झालेल्या कार्याचा अहवाल व आपल्या सूचना सादर करेल.



११. शाखेची सर्वसाधारण सभा निकटच्या वरिष्ठ पक्ष कार्यकारी घटकांच्या परिषदेसाठी प्रतिनिधी निवडेल.

१२. शाखेने जे नवे उमेदवार सभासद व पूर्ण सभासद दाखल करून घेतले असतील त्यांच्याबद्दलचा अहवाल शाखेचा चिटणीस दर दोन महिन्यांनी निकटच्या वरिष्ठ कमिटीला व जिल्हा कौन्सिलला पाठवेल.

१३. एखादा सभासद ज्या ठिकाणी काम करतो किंवा राहतो त्या ठिकाणच्या शाखेचा तो सभासद असला तरी आवश्यकता वाटल्यास त्याला त्याच्या राहण्याच्या ठिकाणाचा किंवा कामाच्या ठिकाणाचा, जसे असेल त्याप्रमाणे, शाखेचाही सहकारी सभासद करून घेता येईल. अशा सहकारी सभासदाला मतदानाचा हक्क मात्र राहणार नाही.

## कलम २८
## मध्यवर्ती कंट्रोल कमिशन

१. अकरा सभासदांपेक्षा जास्त सभासदसंख्या नसलेले मध्यवर्ती कंट्रोल कमिशन पक्षाच्या काँग्रेसमध्ये निवडले जाईल.

२. मध्यवर्ती कंट्रोल कमिशनसाठी निवडावयाच्या सभासदांची नावे राष्ट्रीय कौन्सिल पक्ष-काँग्रेसला सुचवेल. ही नावे सुचविताना उमेदवाराचे पक्षातील स्थान हे १० वर्षांहून कमी असता कामा नये. पक्ष-संघटना कार्यातील त्याचा अनुभव आणि त्याची वैयक्तिक निष्ठा या गोष्टी लक्षात घेतल्या जातील.

३. राष्ट्रीय कौन्सिलची ज्या पद्धतीने निवडणूक घेतली जाते



त्याच पद्धतीने मध्यवर्ती कंट्रोल कमिशनचीही निवडणूक केली जाईल. परंतु मध्यवर्ती कंट्रोल कमिशनची निवड राष्ट्रीय कौन्सिलच्या निवडीपूर्वी होईल.

४. मध्यवर्ती कंट्रोल कमिशन आपला अध्यक्ष आपणच निवडेल. या अध्यक्षाला मध्यवर्ती कार्यकारिणीच्या सर्व सभांना हजर राहण्याचा हक्क राहील आणि शिस्तभंगाच्या प्रकरणांखेरीज इतर सर्व प्रश्नांवर मतदान करण्याचाही हक्क राहील. मध्यवर्ती कंट्रोल कमिशनच्या सर्व सभासदांना राष्ट्रीय कौन्सिलच्या सभांना हजर राहण्याचा आणि मतदानाचा हक्क राहील.

५. मध्यवर्ती कंट्रोल कमिशन खालील प्रकरणे हाती घेईल :

(क) राष्ट्रीय कौन्सिल किंवा राष्ट्रीय कार्यकारिणी यांनी कमिशनकडे पाठविलेली प्रकरणे.

(ख) राज्य कार्यकारिणीने अगर राज्य कौन्सिलने शिस्तभंगाचा इलाज केलेली प्रकरणे.

(ग) ज्या प्रकरणाविरुद्ध राज्य कंट्रोल कमिशनकडे अपील करण्यात आले होते, पण ते फेटाळले गेले आहे आणि त्या विशिष्ट कॉम्रेडने मध्यवर्ती कंट्रोल कमिशनकडे अपील केले आहे, अशी प्रकरणे.

(घ) ज्या प्रकरणामध्ये कोणीही पक्षसभासदाने राज्य कौन्सिल अगर राष्ट्रीय कौन्सिलच्या सभासदांविरुद्ध भ्रष्टाचार किंवा गंभीर गैरव्यवहाराची तक्रार केलेली असेल, मध्यवर्ती कंट्रोल कमिशन या प्रकरणात

स्वत: निवाडा देईल किंवा तक्रार जर राज्य कौन्सिल सभासदाविरुद्ध असेल तर ते प्रकरण राज्य कंट्रोल कमिशनकडे सुपूर्द करेल.

मध्यवर्ती कंट्रोल कमिशन सर्व केसेस किंवा अपील्स हाती आल्यापासून ६ महिन्याचे आत त्यावर निर्णय देण्याचा सर्व प्रकारे प्रयत्न करेल.

६. घटनेचा भंग झाल्याचे किंवा पक्षसभासदावर अन्याय झाल्याचे किंवा त्याच्या हक्कांवर अतिक्रमण झाल्याचे कोणतेही प्रकरण मध्यवर्ती कंट्रोल कमिशनच्या नजरेस आल्यास कमिशनने त्या प्रकरणाकडे मध्यवर्ती कार्यकारिणीचे, राष्ट्रीय कौन्सिलचे किंवा राज्य व जिल्हा कौन्सिल्सचे लक्ष वेधले पाहिजे.

७. सर्वसाधारणपणे मध्यवर्ती कंट्रोल कमिशनचा निर्णय अखेरचा समजला जाईल. राष्ट्रीय कार्यकारिणी मध्यवर्ती कंट्रोल कमिशनच्या एखाद्या निर्णयाची अंमलबजावणी दोन-तृतीयांश बहुमताने स्थगित करू शकेल आणि अगदी पहिली संधी मिळाल्याबरोबर राष्ट्रीय कौन्सिलसमोर ते प्रकरण अखेरच्या निर्णयासाठी ठेवेल.

८. तथापि, सर्व प्रकरणांबाबत पक्ष-काँग्रेसकडे दाद मागण्याचा हक्क राहील.

९. मध्यवर्ती कंट्रोल कमिशनला एखाद्या विशिष्ट पक्ष-घटकाच्या पक्षसभासदत्वाची तपासणी करा, असे जरूर पडल्यास राष्ट्रीय कौन्सिल किंवा राष्ट्रीय कार्यकारिणी किंवा सेक्रेटरीएट सांगू शकेल. किंवा ती त्यांना स्वत:हून करता



येईल.

१०. मध्यवर्ती कंट्रोल कमिशन आपले सभासद, राज्य कंट्रोल कमिशनचे चेअरमन यांची परिषद तीन वर्षांतून एकदा घेईल. या परिषदेत अनुभवांची देवाणघेवाण, समान प्रश्नांची चर्चा व त्यांच्या कार्याशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेईल.

## कलम २९
## राज्य कंट्रोल कमिशन

१. नऊ सभासदांपेक्षा जास्त सभासदसंख्या नसलेले एक राज्य कंट्रोल कमिशन राज्य परिषदेमध्ये निवडले जाईल.

२. मध्यवर्ती कंट्रोल कमिशनच्या उमेदवारांची नावे सुचविताना पाळावयाची जी मार्गदर्शक तत्त्वे आहेत, तीच राज्य कंट्रोल कमिशनच्या उमेदवारांची नावे सुचविण्यासाठीही असतील.

३. राज्य कंट्रोल कमिशनच स्वत:चा अध्यक्ष निवडेल; त्याला राज्यकार्यकारिणीच्या सभांना हजर राहण्याचा आणि शिस्तभंगाबद्दल घेतलेल्या कृतींखेरीज इतर प्रश्नांवर राज्यकार्यकारिणीच्या सभांत मतदान करण्याचा हक्क राहील. राज्य कंट्रोल कमिशनच्या सर्व सभासदांना राज्य कौन्सिलच्या बैठकींना हजर राहण्याचा आणि मतदान करण्याचा हक्क राहील.

४. राज्य कंट्रोल कमिशन खालील प्रकरणे हाती घेईल :

(क) राज्य कौन्सिलने किंवा राज्यकार्यकारिणीने या कमिशनकडे पाठविलेली प्रकरणे.



(ख) जिल्हा कौन्सिल्स, जिल्हा सेक्रेटरीएट किंवा जिल्हा कार्यकारिणीने शिस्तभंगाचा इलाज केलेली आणि त्याबाबत संबंधित कॉम्रेडने अपील केलेली प्रकरणे.

(ग) ज्या प्रकरणांबाबत जिल्हा कौन्सिल, जिल्हा सेक्रेटरीएट किंवा जिल्हा कार्यकारिणीकडे अपील करण्यात आले आहे आणि ते फेटाळले गेले आहे अशी प्रकरणे.

(घ) ज्या प्रकरणामध्ये कोणाही पक्षसभासदाने राज्य कौन्सिल व जिल्हा कौन्सिल सभासदाविरुद्ध भ्रष्टाचार किंवा गंभीर गैरप्रकाराची तक्रार केलेली असेल.

(ङ) कलम २८ मध्ये दिल्याप्रमाणे मध्यवर्ती कंट्रोल कमिशनने राज्य कंट्रोल कमिशनकडे सुपूर्द केलेल्या केसेस.

राज्य कंट्रोल कमिशन सर्व केसेस किंवा अपील्स हाती आल्यापासून ६ महिन्याच्या आत त्यावर निर्णय देण्याचा सर्व प्रकारे प्रयत्न करेल.

५. घटनेचा भंग झाल्याचे किंवा पक्षसभासदावर अन्याय झाल्याचे किंवा त्याच्या हक्कांवर अतिक्रमण झाल्याचे कोणतेही प्रकरण राज्य कंट्रोल कमिशनच्या नजरेस आल्यास कमिशन त्या प्रकरणाकडे राज्य व जिल्हा कौन्सिलचे लक्ष वेधेल.

६. सर्वसाधारणपणे राज्य कंट्रोल कमिशनचे निर्णय अखेरचे समजले जातील. राज्यकार्यकारिणी राज्य कंट्रोल कमिशनच्या



एखाद्या निर्णयाची अंमलबजावणी दोन-तृतीयांश बहुमताने स्थगित करू शकेल आणि असे प्रकरण ताबडतोब मध्यवर्ती कंट्रोल कमिशनकडे अगर राज्य कौन्सिलकडे पाठवेल.

७. वार्षिक सभासदत्व पुनर्नोंदणी पूर्ण झाल्यावर पक्षसभासदांच्या याद्या तपासा, असे राज्य कंट्रोल कमिशनला राज्य कौन्सिल किंवा राज्यकार्यकारिणी सांगू शकेल. किंवा ते स्वत:हून ती तपासणी करतील.

८. राज्य कंट्रोल कमिशन आपल्या कार्यपद्धतीचे नियम ठरवेल.

## कलम ३०
## पक्षशिस्त

१. पक्षाची एकजूट कायम राखण्यासाठी व ती दृढ करण्यासाठी पक्षाचे बळ, लढाऊ सामर्थ्य आणि प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आणि लोकशाही मध्यवर्तित्वाच्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी पक्षात शिस्त असणे अत्यावश्यक आहे. पक्षशिस्तीचे कटाक्षाने पालन केल्याखेरीज पक्षाला जनतेच्या लढ्यांत व कृतीत नेतृत्व करता येणार नाही किंवा जनतेविषयीची आपली जबाबदारी पार पाडता येणार नाही.

२. पक्षाची ध्येये, कार्यक्रम आणि धोरणे जाणतेपणाने मान्य करणे, हा शिस्तीचा आधार आहे. पक्षाच्या सर्वच सभासदांवर शिस्तीचे सारखेच बंधन आहे; मग त्यांचे पक्षसंघटनेतील किंवा सार्वजनिक जीवनातील स्थान कोणतेही असो.

३. पक्षाची घटना व निर्णय यांचे उल्लंघन करणे, तसेच

कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदाला न शोभण्यासारखे दुसरे काहीही कृत्य आणि वर्तन करणे, याचा अर्थ पक्षाची शिस्त मोडणे असा आहे व असे वर्तन शिस्तभंगाचा इलाज योजण्याला पात्र ठरते.

४. शिस्तभंगावरील इलाज असे :

(क) इशारा.

(ख) निंदा.

(ग) जाहीररीत्या निंदा.

(घ) पक्षातील पदावरून दूर करणे.

(ङ) एका वर्षाहून जास्त नाही इतक्या कोणत्याही मुदतीपर्यंत पूर्ण पक्षसभासदत्व तहकूब करणे.

(च) पक्षातून काढून टाकणे.

५. संबंधित कॉम्रेडच्या चुका दुरुस्त करण्यासाठी त्याचे मन वळविणे या इलाजासहित इतर सर्व उपाय निकामी ठरल्यानंतरच सर्वसाधारणपणे त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाचा इलाज योजला जाईल. पण शिस्तभंगाचा इलाज योजल्यानंतरदेखील त्या कॉम्रेडला स्वत:च्या चुका स्वत:च सुधारण्याच्या कामी मदत करण्याचे प्रयत्न चालूच राहतील. पक्षाचे हितसंबंध किंवा त्याची प्रतिष्ठा रक्षण करण्याच्या दृष्टीने ज्या प्रकरणात शिस्तभंग अशा स्वरूपाचा आहे की, त्यावर इलाज ताबडतोब योजणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत असा इलाज तातडीने योजला जाईल.

६. जे सभासद संपफोडे, दारुडे, नीतिभ्रष्ट, पक्षाचा



विश्वासभंग करणारे, पैशाची अफरातफर करणारे असल्याचे आढळून आले किंवा ज्या सभासदांच्या कृती पक्षाला आणि कामगारवर्गाला घातक आहेत, अशा सभासदांविरुद्ध त्यांचे पक्षघटक उपाययोजना करतील आणि ते शिस्तभंगाच्या इलाजाला पात्र ठरतील.

७. कोणत्याही स्त्री-पुरुष सभासदाविरुद्ध योजावयाचा शिस्तभंगाचा उपाय, तो सभासद ज्या घटकाचा सभासद असेल त्या घटकाला किंवा कोणत्याही वरिष्ठ घटकाला घेता येईल. जर ती व्यक्ती एकाहून अधिक घटकांची सभासद असेल तर उपकलम ४ मधील (ङ) आणि (च) मध्ये दर्शविलेले इलाज ज्या सर्वोच्च घटकाची ती सभासद असेल तिलाच घेता येईल आणि हे काम ती स्वत:च पुढाकार घेऊन किंवा कनिष्ठ घटकाच्या शिफारशीला अनुसरून हाती घेऊ शकेल. शिस्तभंगाचे इतर सर्व इलाज तो किंवा ती ज्या घटकाची सभासद आहे, त्यांपैकी कोणत्याही घटकाला घेता येतील.

८. पक्षातून काढून टाकणे हा इलाज शिस्तभंगाच्या इलाजापैकी सर्वात कडक इलाज होय. म्हणून त्याचा वापर अत्यंत सावधगिरीने, विचारपूर्वक आणि न्यायबुद्धीने केला जाईल.

९. पक्षातून काढून टाकल्याचा किंवा सभासदत्व स्थगित केल्याचा शिस्तभंगाचा इलाज वरील घटकाने कायम केल्याशिवाय अमलात येणार नाही. हा निर्णय कायम करण्यासाठी ताबडतोब नजीकच्या वरिष्ठ घटकाकडे पाठवला पाहिजे आणि त्या घटकाने आपला निर्णय तीन महिन्यांच्या आत किंवा



तीन महिन्यांत अशी बैठक न झाल्यास बातमी मिळाल्यानंतरच्या पहिल्याच बैठकीत दिला पाहिजे. शिस्तभंगाचा निर्णय झाल्यापासून ते त्यावर वरिष्ठ घटकाचा निर्णय होईपर्यंतच्या काळात ज्या कॉम्रेडसंबंधी हा निर्णय असेल तो असलेल्या सर्व पदांवरून कमी करण्यात आलेला असेल.

१०. ज्या कॉम्रेडविरुद्ध शिस्तभंगाचा इलाज योजावयाचा असेल त्याला किंवा तिला त्याच्याविरुद्ध असलेले आक्षेप, आरोप आणि इतर संबंधित वस्तुस्थिती यांची संपूर्ण माहिती देण्यात येईल. ज्या पक्ष-घटकासमोर त्याचे किंवा तिचे प्रकरण चर्चेला येणार असेल त्या घटकापुढे आपले म्हणणे स्वत: प्रत्यक्षपणे मांडण्याचा त्याला किंवा तिला हक्क राहील.

११. शिस्तभंगाच्या सर्व प्रकरणात अपील करण्याचा हक्क राहील.

१२. एखादी खालची पक्षकमिटी पक्षाचे निर्णय आणि धोरण सतत धाब्यावर बसवीत असेल, गंभीर स्वरूपाची गटबाजी करीत असेल, किंवा पक्षाची शिस्त मोडत असेल तर त्याबाबत कमिटीला आपल्या भूमिकेचे विवरण करण्याची योग्य संधी देण्यात आल्यानंतर अशी कमिटी बरखास्त करण्याचा किंवा तिच्याविरुद्ध शिस्तभंगाचे इलाज योजण्याचा राष्ट्रीय कौन्सिलला किंवा राज्य कौन्सिलला हक्क आहे.

## कलम ३१
## लोकनियुक्त सार्वजनिक संस्थांतील पक्ष-सभासद

१. संसद, विधानसभा किंवा प्रशासक मंडळे यांवर निवडून आलेले पक्षसभासद आपला एक पक्षगट बनवतील आणि



पक्षाची धोरणे व आदेश यांना दक्षतेने अनुसरून योग्य त्या पक्षकमिटीच्या नेतृत्वाखाली कार्य करतील.

२. कम्युनिस्ट आमदार आणि खासदार अढळपणे जनतेच्या हितसंबंधांचे रक्षण करतील. कायदेमंडळातील त्यांच्या कार्यात जनतेची चळवळ प्रतिबिंबित झाली पाहिजे आणि त्यांनी पक्षाची धोरणे उचलून धरली पाहिजेत व लोकप्रिय केली पाहिजेत.

कम्युनिस्ट आमदार-खासदारांच्या कायदेमंडळातील कार्याची निकटची सांगड पक्षाचे कायदेमंडळाबाहेरील कार्य व जनतेच्या चळवळी यांच्याशी घातली जाईल आणि पक्षाची व जनसंघटनांची बांधणी करण्यात मदत देणे हे सर्व कम्युनिस्ट आमदार-खासदारांचे कर्तव्य राहील.

३. कम्युनिस्ट आमदार आणि खासदार कायदेमंडळातील आपल्या कार्याची आपल्या मतदारांना व जनतेला रीतसर माहिती देऊन आणि त्यांच्या सूचना व सल्ला मिळविण्याचा सतत प्रयत्न करून आपल्या मतदारांशी व जनतेशी शक्यतो अत्यंत निकटचे संबंध ठेवतील.

४. कम्युनिस्ट आमदार आणि खासदार वैयक्तिक सचोटीचा उच्च दर्जा राखतील; साधी राहणी ठेवतील आणि जनतेशी व्यवहार करताना ते सर्व व्यवहारात लीनता दर्शवितील आणि पक्षाला स्वत:पेक्षा श्रेष्ठतर लेखतील.

५. कम्युनिस्ट आमदार व खासदार आणि पगार किंवा भत्ते देणाऱ्या सार्वजनिक संस्थांवर निवडून आलेले कम्युनिस्ट सभासद आपल्या मिळकतीवर योग्य त्या पक्षकमिटीने ठरविलेली लेव्ही नियमितपणे व कसूर न करता देतील. पक्षाची

लेव्ही हा त्यांचा मिळकतीवरील पहिला बोजा राहील.

६. महापालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्यसंस्था आणि ग्रामपंचायती या संस्थांवर निवडून आलेले पक्षसभासद योग्य त्या पक्षकमिटीच्या किंवा पक्षशाखेच्या नेतृत्वाखाली काम करतील. आपले मतदार व जनता यांच्याशी ते दैनंदिन निकटचे संबंध ठेवतील आणि अशा लोकनियुक्त संस्थांत त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करतील. ते मतदारांना आणि जनतेला आपल्या कार्याचा वृत्तांन्त नियमितपणे सांगतील आणि त्यांच्या सूचना व सल्ला मिळविण्याचा प्रयत्न करतील. अशा संस्थेतील कार्याला संस्थेबाहेरील जोमदार जनआंदोलनाची जोड दिली जाईल.

७. लोकसभेच्या निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या सर्व पक्ष-उमेदवारांना कार्यकारिणीची मान्यता लागेल.

राज्यातील विधानसभांच्या किंवा केंद्रशासित विभागातील कौन्सिलच्या निवडणुकांतील पक्ष-उमेदवारांची नावे संबंधित राज्य कार्यकारिणी निश्चित करेल व जाहीर करेल.

महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा बोर्ड्स, लोकल बोर्ड्स आणि ग्रामपंचायती यांच्या निवडणुकीसाठी पक्ष-उमेदवारांची नावे सुचविण्याचे नियम राज्य कौन्सिल अगर ती जेथे अस्तित्वात नसतील तेथे राज्य कार्यकारिणी तयार करेल.

**कलम ३२**
**पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ**

सरचिटणीस, असल्यास उपसरचिटणीस व राज्य सचिव यांचा कार्यकाळ लागोपाठ दोन टर्मसपुरता मर्यादित राहील.



विशेष कारणासाठी तो कार्यकाळ आणखी एका टर्मसाठी वाढवता येईल. पण त्यासाठी — बहुमताने ठराव करावा लागेल. मग तो अन्य उमेदवारासह निवडणूक लढवू शकेल. आवश्यक तेथे जिल्हा सचिव व खालच्या घटकांचे सचिव यांचा कार्यकाळ राज्य कौन्सिल ठरवेल.

**कलम ३३**

सर्व स्तरावरील पक्ष-घटकांच्या तसेच पक्ष परिषदा व पक्ष-काँग्रेसच्या प्रतिनिधींच्या निवडणुका गुप्त मतदानाने होतील. एकापेक्षा जास्त सदस्यसंख्येचा मतदारसंघ असेल तर प्रत्येकाला एकच मत विभागून दिले जाईल. पनेलच्या बाहेरचे नाव दुसऱ्याने सुचवलेले असेल, ज्याचे नाव पॅनेलमध्ये व अन्य सूचनेने आले असेल त्याला नाव मागे घेण्याचा हक्क असेल. जनतेच्या बाहेर जे नाव सुचवलेले असेल व ज्याचे नाव सुचवलेले असेल तो गैरहजर असेल तर त्यांची लेखी पूर्व संमती लागेल. अशा स्थितीत जो नाव सुचवतो त्याला नाव मागे घेण्याचा अधिकारही लेखी स्वरुपात ज्याचे नाव सुचवले असेल त्याला देता येईल.

**कलम ३४**
**पक्षांतर्गत चर्चा**

१. पक्षाला ऐक्यबद्ध करण्यासाठी आणि त्याचे जनताविषयक धोरण घडविण्यासाठी पक्षांतर्गत चर्चा हे पक्षजीवनाचे नियमित लक्षण राहील. विषयाच्या स्वरूपानुसार ही चर्चा अखिल भारतीय प्रमाणावर किंवा पक्षसंघटनेच्या निरनिराळ्या पातळ्यांवर संघटित केली जाईल.



२. पक्षांतर्गत चर्चा पुढीलप्रमाणे संघटित केली जाईल :

(क) ज्या अखिल भारतीय महत्त्वाच्या प्रश्नांवर मध्यवर्ती पक्षघटकाला, किंवा ज्या महत्त्वाच्या प्रश्नांवर राज्य पक्षघटकाला ताबडतोब निर्णय घेण्याची आवश्यकता नाही, अशा प्रश्नांवर निर्णय घेण्यापूर्वी, चर्चा संघटित केली जाईल.

(ख) धोरणासंबंधीच्या एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर राष्ट्रीय कौन्सिल अगर राज्य कौन्सिलमध्ये पुरेसे निश्चित बहुमत नसेल तेव्हा अशा प्रश्नांवर चर्चा संघटित केली जाईल.

(ग) एकूण पक्षसभासदांच्या एक-तृतीयांश विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक राज्य संघटनांनी अखिल भारतीय स्वरूपाची पक्षांतर्गत चर्चा संघटित करण्याची मागणी केली, किंवा राज्य पातळीवर संबधित राज्यातील एकूण सभासदांच्या एक-तृतीयांश विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जिल्हा संघटनांनी मागणी केली, तर अशी पक्षांतर्गत चर्चा संघटित केली जाईल.

३. पक्षांतर्गत चर्चा राष्ट्रीय कौन्सिलच्या अगर राज्य कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली चालविली जाईल. संबंधित चर्चावयाच्या प्रश्नांची मांडणी करील. ज्या पक्ष कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली चर्चा चालेल, ते पक्षकौन्सिल ही चर्चा चालविण्याची पद्धत ठरवील.



**कलम ३५**
**पक्ष-काँग्रेस आणि परिषदांच्या पूर्वतयारीची चर्चा**

पक्षाची काँग्रेस भरण्याच्या किमान दोन महिने अगोदर राष्ट्रीय कौन्सिल पक्षाच्या सर्व घटकांच्या चर्चेसाठी ठरावांचे मसुदे प्रसिद्ध करील. ठरावांना आणावयाच्या उपसूचना सरळ राष्ट्रीय कार्यकारिणीकडे पाठवाव्या; कार्यकारिणी त्यांची वर्गवारी करून त्या पक्ष काँग्रेसपुढे मांडील.

राजकीय व संघटनात्मक ठरावांच्या मसुद्याबरोबर अगोदरच्या तीन वर्षातील घटनांचे निष्कर्ष व धडे यांचा समावेश असावा. त्यामुळे पक्षघटकांना आपले मत देता येईल. सर्व ठरावांचे मसूदे राज्य कौन्सिलना पाठवले जातील.

**कलम ३६**
**जनसंघटनात काम करणारे पक्षसभासद**

जनसंघटनांत आणि त्यांच्या कार्यकारी मंडळात काम करणारे पक्षसभासद योग्य त्या पक्षकमिटीच्या मार्गदर्शनाखाली संघटितरीत्या कार्य करतील. त्यांनी संबंधित जनसंघटनांचे ऐक्य, जनतेतील त्यांचा पाया आणि त्यांचे लढाऊ सामर्थ्य दृढ करण्याचा नेहमीच प्रयत्न केला पाहिजे.

**कलम ३७**

पक्षघटनेखालील नियम पक्षघटनेला धरून राष्ट्रीय कौन्सिल तयार करू शकेल. पक्षघटनेखालील नियम पक्षघटनेला धरून राज्य कौन्सिलही करू शकतील; मात्र त्यांना राष्ट्रीय कौन्सिलची मंजुरी मिळवावी लागेल.

**कलम ३८**
**दुरुस्ती**

पक्षघटनेत फक्त पक्षकाँग्रेसलाच किंवा तातडीची गरज असल्यास राष्ट्रीय कौन्सिलला दोन-तृतीयांश बहुमताने दुरुस्त्या करता येतील. यापैकी कोणत्याही परिस्थितीत, घटनेतील दुरुस्तीच्या सूचनांची नोटीस त्या पक्षकाँग्रेसची किंवा राष्ट्रीय कौन्सिलची बैठक भरण्यापूर्वी दोन महिने अगोदर दिली पाहिजे. मात्र आणीबाणीच्या परिस्थितीत आणि काही विशिष्ट कारणांसाठी दोन-तृतीयांश बहुमताने नोटिशीची ही अट दूर करता येईल; ही कारणे राष्ट्रीय कौन्सिलने पक्षाच्या काँग्रेससमोर ठेवली पाहिजेत.

## पक्ष-घटनेखालील नियम

१. **कलम ४ खाली :** उपकलम ४ मध्ये उल्लेख केलेल्या परिस्थितीत, अशा सभासदांना त्या त्या परिस्थितीप्रमाणे उमेदवार किंवा पूर्ण सभासद करून घेण्याचा निर्णय संबंधित वरिष्ठ घटकाला घेता येईल.

एखादा पक्षसभासद एक मोहल्ला (Locality) सोडून दुसऱ्या मोहल्ल्यात जात असेल, तर त्यांने आपल्या घटकाला त्याप्रमाणे कळवावे आणि आपल्या घटकाकडून सभासदत्वाच्या बदलीचे पत्र घ्यावे; या पत्रावर योग्य त्या पक्षकमिटीच्या सेक्रेटरीची सही हवी. (हा नियम पूर्ण वेळ देणाऱ्या पक्षसभासदाला लागू नाही.) पक्षसभासद जिल्ह्यातच, पण एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात जात असेल, किंवा



त्याच राज्यात परंतु एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात जात असेल तर या बाबतीतील योग्य अधिकारी संस्था जिल्हा कौन्सिल किंवा जिल्हा कार्यकारिणी राहील; राज्याच्या बाहेर जात असेल तर ही अधिकारी संस्था राज्य कौन्सिल किंवा कार्यकारिणी राहील. योग्य त्या पक्षकौन्सिलमार्फत बदलीचे अनुरूप सूचनापत्र जोपर्यंत मिळाले नाही तोपर्यंत पक्षशाखेला दुसऱ्या घटकाच्या सभासदाला आपल्या शाखेचा सभासद करून घेता येणार नाही.

पक्षाला पूर्णवेळ देणाऱ्या पक्षसभासदाला, तो ज्या पक्षघटकाचा किंवा कौन्सिलचा सभासद असेल त्याच्या पूर्वपरवानगीशिवाय आपला मोहल्ला सोडून दुसऱ्या मोहल्ल्यात जाता येणार नाही.

२. **कलम ५ खाली :** पक्षात नव्याने प्रवेश करणाऱ्या सभासदांना सभासदपत्रिकेवरील पक्षप्रतिज्ञेवर सही करावी लागेल; त्याखेरीज त्याला सर्वसाधारण सभेतही पक्षप्रतिज्ञा घ्यावी लागेल. नव्याने प्रवेश दिलेल्या सभासदाकडून प्रतिज्ञा म्हणवून घेण्याचे कार्य सभेचा अध्यक्ष करील.

३. **कलम ६ व ७ :** उमेदवार सभासदालाही पार्टीकार्ड देण्यात येईल, पण या कार्डाचे स्वरूप वेगळे असेल; तो उमेदवार सभासद आहे, असे दर्शविणारी त्यावर खास वेगळी खूण असेल.

पार्टीकार्डे देण्याच्या कार्यात नियमितपणा आणला पाहिजे आणि कार्डावर योग्य आणि पूर्ण माहिती भरून दिली पाहिजे.



प्रत्येक कार्डावर राज्य-सेक्रेटरीचीही सही किंवा सहीचा शिक्का पाहिजे आणि जिल्हा-सेक्रेटरीची ही सही पाहिजे.

४. **कलम ७ खाली :** निष्क्रिय बनला म्हणून ज्या पक्ष-सभासदाच्या सभासदत्वाचे नूतनीकरण झाले नव्हते, पण या खेरीज ज्यांच्याविरूद्ध दुसरा कोणताही आरोप नव्हता, अशा पक्षसभासदाला पक्षात पुन: प्रवेश हवा असेल आणि जर तो सभासदत्वाच्या सर्व शर्ती पूर्ण करीत असेल, तर त्याला पूर्ण सभासद म्हणून पुन: प्रवेश देता येईल; मात्र वरिष्ठ कमिटीने त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले असले पाहिजे.

५. **कलम ७ खाली :** एखादा पक्षसभासद ज्या पक्षघटकाचा सभासद आहे, त्या पक्षघटकाच्या चुकीमुळे, जर त्याच्या सभासदत्वाचे नूतनीकरण राष्ट्रीय कौन्सिलने ठरविलेल्या काळात झालेले नसेल, तर त्या काळानंतरही त्याला आपले सभासदत्व मिळविण्याचा हक्क राहील; मात्र त्याने फेब्रुवारी अखेरपर्यंत (म्हणजे सभासदत्वाच्या नूतनीकरणाच्या शेवटच्या तारखेपासून चार आठवड्यांच्या आत) आपल्या सभासदत्वाच्या नूतनीकरणाचे अपील सरळसरळ निकटच्या वरिष्ठ कमिटीकडे केले असेल आणि ज्या कमिटीकडे त्याने नूतनीकरणाचा अर्ज केला त्या कमिटीकडे आपल्याकडून येणे असलेली सभासदत्वाची वर्गणी आणि लेव्ही भरली असेल, तरच त्याला हा हक्क राहील.

अशा प्रकरणांत, अर्जदाराने आपल्या सभासदत्वाचे नूतनीकरण मिळविण्यात त्याने आपल्या स्वत:च्या पक्षघटकात कोणकोणते प्रयत्न केले ते लिहायला पाहिजे. नूतनीकरणासाठी



केलेला अर्ज राज्यकमिटीकडे आला असेल, ती कमिटी अपीलासाठी दिलेल्या कारणांची तपासणी करील आणि अर्जावर योग्य तो निर्णय घेईल.

६. **कलम ११ खाली :** ज्यांना वेतन, पगार किंवा तत्सम उत्पन्न मिळते त्यांच्या पार्टीलेव्हीची रक्कम दर महिन्याच्या ठरविली जाईल; पण ज्यांचे उत्पन्न मोसमी आहे त्यांची लेव्हीची रक्कम दरसालच्या पायावर ठरविली जाईल.

पार्टी लेव्ही देण्याची तारीख उलटून चार महिने होऊन गेल्यावरही एखाद्या पक्षसभासदाने आपली लेव्ही भरली नसेल तर त्याला त्याच्या शाखेकडून इषारा दिला जाईल. पक्ष-सभासदत्वाच्या वार्षिक नूतनीकरणाच्या काळापर्यंत एखाद्या सभासदाने आपली लेव्ही भरली नसेल, तर त्याच्या सभासदत्वाचे नूतनीकरण केले जाणार नाही.

हा निर्णय घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या आत जर त्या सभासदाने आपली सर्व बाकी भरली आणि पक्षात पुन: दाखल करून घेण्यासाठी अर्ज केला, तर त्याला पुन: दाखल करून घेता येईल आणि त्याचे सभासदत्व अखंड राहू देता येईल.

अडचणीच्या काही खास परिस्थितीत, उदाहरणार्थ-बेकारी, सततचा आजार, पिके बुडणे वगैरे, पक्षसभासदाला पार्टी लेव्ही भरण्यापासून सूट देता येईल; सूट तो ज्या पक्षघटकाचा सभासद असेल त्या घटकाला देता येईल.

सर्व पार्टी-कार्डावर पक्ष-सभासदत्वाच्या वर्गणीच्या तसेच पार्टी लेव्ही संबंधीच्या नियमित नोंदी असतील.

७. पक्ष केंद्र पक्ष काँग्रेसपूर्वी व राज्य केंद्र राज्य परिषदेपूर्वी बऱ्याच अगोदर मार्गदर्शक सूत्रे नियमितपणे पाठवेल. या सूत्रात अन्य बाबीसह निरनिराळ्या पातळीवर स्त्रिया, अनुसूचीत जाती-जमाती व अन्य मागासवर्गीय याना नेतृत्वात निवडणे ही असेल. त्याबाबत परत अहवाल घेऊन, तपासणी केली जाईल. ही तपासणी सातत्याने करण्याची गरज आहे. पक्षाच्या पुढारी कमिट्यात त्यांचा समावेश हा पक्षाचा सामाजिक आशय अधिक सुधारण्यासाठी महत्वाचा आहे म्हणून अन्य बाबींबरोबर याची तपासणी आवश्यक आहे.

७. **(अ) कलम १६ व २० खाली :** राष्ट्रीय परिषद असो वा राज्य परिषद  असो आवश्यक वाटत असेल तर परिषदेच्या १० टक्केपर्यंत सदस्यांना आमंत्रीत सदस्य म्हणून आमंत्रीत करू शकते; परंतु त्याना मतदानाचा अधिकार असणार नाही. सामान्यत: काही क्षेत्रांना व आंदोलनांना पुरेसे प्रतिनिधीत्व देण्यासाठी हे असेल.

८. **कलम १८ खाली :** काही विशिष्ट कार्यक्षेत्रांमध्ये विभागीय सूत्रबद्धता साधण्यासाठी, केंद्रिय कार्यकारिणीने संबंधित राज्य कौन्सिलच्या प्रतिनिधींच्या तात्पुरत्या बैठकी बोलवाव्यात किंवा उपयुक्त आणि आवश्यक भासत असेल तर एखादी विभागीय सुसूत्रीकरण कमिटीही बनवावी.

९. **कलम १९, उपकलम ९ (ग) खाली :** एखाद्या राज्याला  आपली नियमित पक्षपरिषद घेता आली नाही, तर त्या राज्यातून पक्ष-काँग्रेससाठी प्रतिनिधी कसे निवडायचे त्याबाबतची निवडणूक पद्धती राष्ट्रीय कौन्सिल किंवा राष्ट्रीय



कार्यकारिणी ठरवील. तसेच जिल्ह्याच्या बाबतीत राज्य कौन्सिल किंवा राज्य कार्यकारिणी निर्णय घेईल. कोणाही कॉम्रेडला पक्ष परिषदासाठी प्रतिनिधी म्हणून, तो ज्या घटकाचा सभासद नाही त्या घटकातून निवडता येणार नाही.

पक्षपरिषदांना, आपल्या पसंतीचा क्रम देऊन पर्यायी प्रतिनिधी निवडण्याचा हक्क आहे; त्यांची संख्या प्रतिनिधींच्या एकंदर संख्येच्या एक-दशांशाहून जास्त असता कामा नये. पर्यायी प्रतिनिधींना पक्षकाँग्रेसला हजर राहण्याचा व तिच्या कामात भाग घेण्याचा अधिकार आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवरील पक्ष परिषदांनाही हजर राहण्याचा व त्यांच्या कामात भाग घेण्याचा अधिकार आहे. पण त्याना मत देण्याचा अधिकार नाही. याला एकच अपवाद आहे. त्या विशिष्ट राज्यातून निवडून दिलेल्या प्रतिनिधीपैकी एखादा गैरहजर असेल, तर त्याच्या जागी जो कोणी पर्यायी प्रतिनिधी पूर्ण प्रतिनिधी बनला असेल, त्याला मताधिकार राहील.

१०. **कलम २५ खाली :** पक्षशाखेच्या सर्वसाधारण सभेला स्वत:च्या कार्यक्षेत्रातील सर्व बाबींवर निर्णय घेण्याचा हक्क आहे. परंतु पक्षाचे निर्णय समजावून सांगण्यासाठी किंवा एखाद्या जनमोहिमेबाबत भागाच्या सर्वसाधारण सभा घेतल्या असतील तर त्या सभांत, त्या विशिष्ट प्रश्नांपुरताच विचार होईल आणि तेथे जर काही निर्णय घेण्यात आले तर त्यांचे स्वरूप शिफारसवजा असेल; अंतिम निर्णय घेण्याचा हक्क त्या पातळीवरील पक्ष-कमिटीलाच आहे.

११. **कलम २८ खाली :** राज्य कंट्रोल कमिशनने वर्षातील आपल्या कामाचा आणि कार्यपद्धतीचा वार्षिक



अहवाल तयार केला पाहिजे आणि तो केंद्र कंट्रोल कमिशनकडे पाठविला पाहिजे व त्याची एक प्रत राज्य कौन्सिलकडे पाठविली पाहिजे. केंद्र कंट्रोल कमिशनने त्याचा आढावा घेतला पाहिजे आणि असल्याच तर आपल्या सूचना संबंधित राज्य कंट्रोल कमिशनकडे पाठविल्या पाहिजेत.

१२. **कलम ३१ उपकलम ५ खाली :** पार्टी लेव्ही न दिल्यास कोणती कृती करायची याबद्दलचे वर दिलेले नियम आमदार आणि खासदार यांनाही लागू आहेत; मात्र आमदारांच्या पक्षसभासदत्वाच्या नूतनीकरणाबाबतचा निर्णय राज्य कौन्सिल किंवा राज्य कार्यकारिणी घेईल; आणि खासदारांच्या बाबतीतील निर्णय राष्ट्रीय कौन्सिल किंवा केंद्र कार्यकारिणी घेईल.

१३. **सभा चालविणे आणि कमिट्यांकडून काम करवून घेणे :** राष्ट्रीय, राज्य अथवा जिल्हा पातळीवरील कौन्सिलची नेहमीची सभा घेण्यासाठी किमान दोन आठवड्यांची नोटीस लागते; कार्यकारिणीच्या सभेला एक आठवड्यांची नोटीस लागते. सभेच्या नोटीशीबरोबरच सभेची कार्यक्रमपत्रिकाही सभासदांत सर्वसाधारणपणे फिरविली पाहिजे. तातडीच्या सभा अल्पमुदतीच्या नोटिशीने भरविता येतील.

**क्वोरम :** राष्ट्रीय कौन्सिल आणि राज्य कौन्सिलच्या नेहमीच्या सभा (आणि कार्यकारिणीची तातडीची सभा) यासाठी क्वोरमची संख्या एकंदर सभासद संख्येच्या अर्धी राहील, राष्ट्रीय किंवा राज्य कार्यकारिणीच्या नेहमीच्या सभेसाठी क्वोरमची संख्या दोन-तृतीयांश राहील; जिल्हा आणि दरम्यानच्या पातळीवरील पक्ष-कौन्सिलांच्या सभांसाठी क्वोरम दोन-पंचमांश राहील; आणि पक्षशाखांसाठी एक-



तृतीयांश असेल. (हा हिस्सा त्या घटकाच्या एकंदर सभासदसंख्येचा हिस्सा समजावा.) क्वोरम न भरल्यास, सभेला अहवाल घेता येतील किंवा काही अनौपचारिक चर्चा किंवा सल्लामसलत करता येईल. मात्र जरूर तितके क्वोरम असेल तरच सभेच्या निर्णयांना घटकांच्या निर्णयांचा अधिकार प्राप्त होईल.

पक्षघटकाच्या कोणत्याही सभासदाला कार्यक्रमपत्रिकेवर एखादा विषय घ्यावा असे वाटत असेल, तर त्याने त्याची नोटीस संबंधित घटक सेक्रेटरीला दिलीच पाहिजे; कार्यक्रमपत्रिकेवर कोणता विषय घ्यावा किंवा घेऊ नये याविषयी कोणताही निर्णय घेण्याचा पूर्ण हक्क घटकाकडे राहील.

काही खास कामानिमित्त बोलावलेल्या तातडीच्या सभेखेरीज, घटकाच्या प्रत्येक सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवरील पहिला विषय पूर्वीच्या सभेने घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या तपासणी (चेकअप)चा असेल. सभेने सभेचा कार्यक्रम आणि वेळापत्रक ठरविल्यानंतर कामाची तपशीलवार पद्धती ठरविणे आणि कोणाला किती वेळ द्यायचा ते ठरविणे ही कामे अध्यक्ष किंवा अध्यक्षमंडळ (जे कोणी असेल त्याप्रमाणे) त्यांच्याकडे सोपवावीत; सभेचे काम व्यवस्थितपणे चालविण्याची आद्य जबाबदारी त्यांच्यावरच आहे.

राज्यपातळीवरील तसेच त्याखालच्या पक्षघटकांच्या पातळीवरील सभांचे काम नीट चालावे आणि पार्टीचे कागदपत्र (रेकॉर्डस्), सभेची मिनिट्स् वगैरे नीट ठेवली जावीत, म्हणून राज्य कौन्सिलने नियम बनवावेत; हेतू असा की त्याबाबत वाद व भांडणे शक्य तितकी कमी व्हावीत. पक्षसभांचे काम सुरळीत चालावे म्हणून काही मार्गदर्शक

तत्त्वांची दिशा घालून देण्यात यावी आणि असलेल्या वेळेचा नीट उपयोग व्हावा या दृष्टीने त्यांची अंमलबजावणी व्हावी.

प्रत्येक पार्टी कमिटीने सभांचे हजेरीपत्रक ठेवले पाहिजे. पूर्वसूचना न देता सभासद गैरहजर राहिल्यास त्याचा जाब (एक्स्प्लनेशन) विचारावा आणि त्याची नोंद करावी. योग्य कारण नसताना एखादा सभासद लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिल्यास, आठव्या पक्ष-काँग्रेसने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे त्याचे त्या पक्षघटकाच्या सभासदपटावरील नाव तो संबंधित घटक काढून टाकील.

१४. **निवडणुकीची पद्धती :** कोणाही कॉम्रेडला पक्ष-परिषदेसाठी तो ज्या युनिटचा सभासद नाही, त्या युनिटमधून प्रतिनिधी म्हणून निवडता येणार नाही. (जुलै १९८२ च्या बैठकीत राष्ट्रीय कौन्सिलने केलेला नियम.)

१५. राष्ट्रीय कार्यकारिणीचे किमान दोन तृतीयांश सभासद मध्यवर्ती केंद्रातून काम करतील. हाच नियम राज्य कार्यकारिणीला लागू असेल.



**मुद्रक** : प्रकाश विश्वासराव, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

**प्रकाशक** : कॉ. गोविंद पाटकर ३१४, राजभुवन, सरदार वल्लभभाई पटेल रोड, मुंबई ४०० ००४